


# संपादकीय

- अमुल दयानंद बनसोड

प्रिय वाचकांनो,

प्रभू येशूच्या नावामध्ये सर्व वाचकांना प्रेमपूर्वक सलाम. आम्हाला खात्री आहे की आतापर्यंत तुम्हाला मिळालेली व्हाईस ऑफ ट्रूथची संपूर्ण त्रैमासिक तुम्हाला नक्कीच आवडलेली असेल. आतापर्यंत तुम्हाला आठ त्रैमासिक मिळाले असेल, नसेल तर आम्हाला लिहा म्हणजे आम्ही ती मागील त्रैमासिके पुन्हा तुम्हाला पाठवू.

हे नववे व्हाईस ऑफ ट्रूथचे त्रैमासिक तुम्हाला देतांना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. ह्या संपूर्ण पुस्तकामध्ये तुम्हास विविध लेख देण्यात आले आहे. पवित्रशास्त्राच्या सखोल अभ्यासकांनी हे लेख लिहिलेले आहेत. आजच्या ह्या काळामध्ये ह्या पवित्रशास्त्राच्या अभ्यासकांची व शिकण्याची फार गरज आहे. प्रे.कृ. ८ व्या अध्यायात प्रभूचा सेवक फिलिप्प हा दूताने सांगितल्याप्रमाणे राणी कांदके हिच्या मोठ्या अधिकाऱ्याला भेटला व हा अधिकारी वाचीत असलेला शास्त्रलेख पाहून फिलिप्पाने म्हटले, ''आपण जे वाचीत आहा ते आपल्याला समजते काय?'' (प्रे.कृ.८:३०). हा अधिकारी यशयाच्या ग्रंथातील

शास्त्रलेख वाचत होता, पण त्याला त्याचा संदर्भ समजत नव्हता, तेव्हा त्याने प्रामाणिकपणे फिलिप्पाला म्हटले, "कोणी मार्ग दाखविल्या खेरीज मला कसे समजणार? (प्रे.कृ.८:३१). ह्यावरून समजते की ह्या मनुष्याला शिकण्याची व समजून घेण्याची आवड होती. त्यामुळे त्याने फिलिप्पाला प्रतिप्रश्न केला की "मला हे कसे समजणार, जोपर्यंत ते मला कोणी समजून सांगणार नाही." ह्या मनुष्याची पवित्र शास्त्राविषयी उत्कंठा पाहून फिलिप्पाने त्याला ह्या शास्त्रलेखाबद्दल सविस्तर समजावून सांगितले (प्रे.कृ.८:३२-३३; यशया ५३:७-८).

प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता मनापासून ऐकत असताना ह्या अधिकाऱ्याने पुन्हा एक प्रश्न फिलिप्पाला केला, "....पाहा हे पाणी; मला बाप्तिस्मा घेण्यास काय हरकत आहे?" (प्रे.कृ.८:३६). ह्यावरून नक्कीच तुम्हाला कळाले असेल की प्रभूचा सेवक फिलिप्प त्याला येशूविषयी सांगत असताना बाप्तिस्म्याबद्दल सुद्धा सांगितले. जर फिलिप्पाने ह्या अधिकाऱ्याला बाप्तिस्म्याविषयी सांगितले नसते तर त्याने कोणताच प्रश्न बाप्तिसस्म्याबद्दल केला नसता. पण नक्कीच फिलिप्पाने त्याला बाप्तिस्म्याबद्दल सविस्तर समजावून सांगितले. कारण प्रभू येशूने पुन:रूत्थान झाल्यानंतर स्वत: आज्ञा दिली की, "..... सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल" (मार्क १६:१५-१६). ह्या महान आज्ञेनुसार "तेव्हा त्याने रथा उभा करावयास सांगीतले; आणि फिलिप्प व षंढ (कांदके राणीचा अधिकारी) असे ते दोघे पाण्यात उतरले; आणि त्याने त्याला बाप्तिस्मा दिला" (प्रे.कृ.८:३८) आणि हा अधिकारी त्याच वेळेस ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद बनला की जी मंडळी ख्रिस्ताने बांधली होती (मत्तय १६:१८; रोम १६:१६).

वाचकांनो, ह्या संपादकीय लेखांविषयी मी काही विचार तुम्हासमोर ठेवीत आहे.

१) इतका मोठा हा अधिकारी असून सुद्धा तो प्रवासामध्ये पवित्रशास्त्र वाचत होता.

२) त्याला स्वत: वाचनाची आणि समजून घेण्याची आवड होती.


३) येशू ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्याविषयी जेव्हा त्याने ऐकले तेव्हा त्याने तात्काळ निर्णय घेऊन बाप्तिस्मा घेतला.

४) हा बाप्तिस्मा त्याने बुडून घेतला. (शिंपडून किंवा ओतून घेतला नाही)

५) बाप्तिस्मा घेतल्यानंतर तो कोणत्या मंडळीचा सभासद झाला असेल? ह्या पुस्तकातील अध्यात्मिक लेखांद्वारे परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो.

• • •

"..... सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल" (मार्क १६:१५-१६)



# येशू रडला

## योहान ११:३५

**- जे.सी.चोट**

**ओळख :**

१) आम्ही सर्व पवित्रशास्त्रातील सर्वात लहान वचनाशी परिचित आहोत, ''येशू रडला'' (योहान ११:३५).

२) काही वेगवेगळ्या भाषांतरामध्ये पहा.

क) येशू ओक्साबोक्सी रडला. (मॉफट)

ख) ''येशूचे अश्रू वाहले''. (गुड स्पीड)

ग) ''आणि येशू स्वत: रडत होता''. (बेसिक इंग्लिश)

घ) ''येशूच्या डोळ्यात पाणी आले''. (लिविंग बायबल)

३) रडणे कमजोरीचे प्रतिक नाही.

४) रडण्याचा अर्थ पुष्कळ गोष्टी आहेत.

क) हा व्यक्ती भावनांना समजू शकतो.

ख) त्याचे मन दु:खी झाले आहे

ग) कष्ट

घ) शोक

ड) व्यक्तीगत ओढ

च) पूर्ण विश्वास

छ) सहानुभूती

ज) सत्य

**चर्चा :**

१) येशू व्यक्तीसाठी रडला (योहान ११:१-४६).

२) येशू नगरासाठी रडला (मत्तय २३:२७, लूक १३:३४, लूक १९:४१-४८).

३) येशू पिढीसाठी रडला (लूक ७:३१-३५, योहान १:११).

४) येशूला जगाची काळजी होती,(मत्तय २६:३६-४६, लूक २३:४६, पेत्राचे पहिले पत्र २:२१, ३:१४-१८)

**निष्कर्ष :**

१) येशूला आमच्यापैकी प्रत्येकामध्ये आवड आहे आणि त्याला आमची काळजी आहे.

२) येशूला आपल्या लोकांद्वारे नेहमी नाकारल्यामुळे, नव्याने पुन्हा वधस्तंभावर जाऊन फार दु:ख होते.

३) जगाला हरविलेल्या स्थितीत पाहून त्याला दु:ख होते. ज्याच्या तारणासाठी तो मरण पावला.

४) संपूर्ण जगात सुवार्तेला घेऊन जाणाऱ्या त्याच्या आज्ञेला पूर्ण करण्यास आम्ही अपयशी राहिल्यावर त्याला होणाऱ्या दु:खाची कल्पना करा.

५) परमेश्वर आमचे साहाय्य करो की आम्ही आणखी समर्पित व्हावे, न की आपल्या तारणाऱ्याला दु:ख देणारे.

• • •

# सेवक वडील

- जेरी बेट्स

मंडळीच्या प्रारंभापासूनच देवाने नेमून दिले की तिला वडिलांच्या आणि सेवकांच्या (Deacons) द्वारे चालवावे. सर्व शतकांमध्ये मनुष्याने ह्या दैवी योजनेपेक्षा ह्याचा अनेक यंत्रणेमध्ये वापर केला. तथापि, ज्या मंडळ्यांची देवाची योजना अनुसरण्याची इच्छा आहे ते सतत वडील आणि सेवकांची जी साधारण योजना आहे त्याद्वारे चालविल्या जाते. ह्या विषयावरील प्रबंधामध्ये आम्हाला हा प्रश्न विचारात घ्यायचा आहे की, "वडील मंडळीला कसे मार्गदर्शन करू शकतात ?" मी सहमत आहे की अनेक वडील फार सजग आणि प्रामाणिकपणे देवाला जसे वाटते तसे त्या मार्गाने त्यांच्या आदरणीय मंडळ्यांचे मार्गदर्शन आणि देखरेख योग्य प्रकारे करतात. दुसऱ्या बाजूने सांगावयाचे झाल्यास तर काहीजण चुकीच्या मार्गाने किंवा चुकीच्या उद्देशाने मार्गदर्शन करतात.

पुढारीपण हे भययुक्त जबाबदारी आहे. पवित्रशास्त्रामध्ये काही झोंबणारे शब्द पुरुषांसाठी राखून ठेवले आहेत की जे पुढारी व्हायला पाहिजे होते पण झाले नाहीत. यहेज्केल ३४:१-६ मध्ये दुष्ट मेंढपाळाचे चित्र रंगविले आहे आणि यशयाने इस्त्राएलाच्या पुढाऱ्यांचे असे वर्णन केले आहे की ते आंधळे पहारेकरी आणि न भुंकणारे कुत्रे आहेत (यशया ५६:९-१२). मत्तय २३ मधील येशूच्या शब्दांकडे लक्ष द्या की ज्यामध्ये शास्त्री आणि परूष्यांविषयी धिक्कारांची मालिका आम्हाला आढळते. ह्या यहुदी पुढाऱ्यांनी नितीमत्वाचे उदाहरण असायला पाहिजे होते. तथापि, त्या एकाच अध्यायामध्ये आठ वेळा येशूने त्यांना ढोंगी म्हटले आहे. स्पष्टपणे हा काही आदर्श एखाद्याने अनुसरण्याचा नाही.

काही लोक व्यवसायासारखे आदर्शाने पाहतात की ज्यामध्ये वडिलांनी मार्गदर्शन करावे. वडील संचालक मंडळाप्रमाणे, मंडळीवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतात आणि साहेबासारखी कृती करून संपूर्ण मंडळीने ते पाळावे असे निर्णय घेतात. ते कार्य करण्यासाठी वेगवेगळे सेवकवर्ग भाड्याने घेतात आणि जर त्यांनी इच्छित परिणाम साधला नाही तर त्यांना बदलल्या जाते. तरीपण हा वरील आदर्श पवित्रशास्त्रीय नाही. मेंढपाळ अध्यात्मिक पुढारी आहे आणि त्याचे कळपासोबत नाते आहे हे पवित्रशास्त्रामध्ये लाक्षणिक प्रभावाने वापरण्यात आले आहे. ५०० पेक्षा अधिक वेळा हे वापरल्या गेले आहे. येथू मुख्य मेंढपाळ आहे आणि आजच्या आत्मिक पुढाऱ्यांनी ख्रिस्ताचे अनुकरण त्याच्या प्रेमळ सेवेने आणि खऱ्या नात्याने करावे. हे सेवकावर मालक असण्याचे नाते नसावे, तर प्रेमाचे आणि सेवेचे असावे.

मेंढपाळ आणि मेंढरांची कल्पना वडील आणि मंडळीचे नाते दर्शविण्यासाठी तीन बाबींचा उल्लेख केलेला आहे. पहिले हे की, वडील उपलब्ध असायला पाहिजे. जसा मेंढपाळ आपल्या मेंढरासमवेत अधिक वेळ घालवितो, तसाच वेळ नातेसंबंध वाढविण्यासाठी अध्यात्मिक

कळपासमवेत घालवावा. दुसरे असे की, मेंढरांना कसल्याही प्रकारची गरज असेल, तेव्हा मेंढपाळ त्याचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करतो. तशाचप्रमाणे वडिलांनी सुद्धा कळपाच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी समर्पित असायला पाहिजे. वडिलांनी मेंढरांच्या कमतरतेबद्दल निर्णय घेऊ नये, तर त्याने कळपाचा दोष आणि उणेपणावर फार मोठी दया दाखवावी. सरतेशेवटी काही काळानंतर भरवसा प्राप्त करून पक्का करणे होय. मेंढरे मेंढपाळावर भरवसा ठेवितात आणि मंडळीने वडिलांवर भरवसा ठेवायलाच पाहिजे. तरीसुद्धा हा भरवसा मिळविता आला पाहिजे आणि नक्कीच हा भरवसा त्याने वडील बनण्यापूर्वीच प्राप्त करायला हवा. आम्ही येशूवर भरवसा ठेवितो कारण आम्हाला माहीत आहे की तो त्याचे अभिवचन पाळीतो, तशाचप्रमाणे वडिलांनी सर्व प्रमाणात भरवसालायक असायला पाहिजे.

वडील कळपांसाठी कित्ता आहेत. काही लोकांचे म्हणणे आहे की वडिलांना खरा अधिकार नाही आणि त्यांनी फक्त स्वत:च्या उदाहरणांनी मार्गदर्शन करावे. ही कल्पना त्यांचा अधिकार कमी करते व त्यांनी कसे कार्य करावे हे दर्शविते. कोणीतरी म्हटले, "जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्याचा अधिकार ठासून सांगावा लागतो तेव्हा त्याचा असाच अर्थ होतो की त्याला फार कमी अधिकार आहे." जेव्हा वडील हे योग्य कित्ता असतात तेव्हा इतरांना त्यांचे पुढारीपण आनंदाने अनुसरावे वाटते. इतरांनी काय करावे हे सांगणेच फक्त त्यांचे कार्य नाही. परंतु कशा प्रकारे जगावे आणि देवाचे कार्य कसे करावे हे त्यानी इतरांना दाखवणे सुद्धा आहे. त्यांचे कार्य मदतनिसांचे आहे, जसे की कशाप्रकारे येशू त्यांच्या शिष्यांसोबत संबंधीत होता.

येशूने म्हटले, "परराष्ट्रीयांवर त्यांचे अधिपति प्रभूत्व चालवितात व मोठे लोकही अधिकार करितात हे तुम्हास ठाऊक आहे. तसे तुम्हामध्ये नाही, तर जो कोणी तुम्हामध्ये श्रेष्ठ होऊ पाहतो तो तुमचा सेवक होईल,

आणि जो कोणी तुम्हामध्ये पहिला होऊ पाहतो तो तुमचा दास होईल. ह्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे" (मत्तय २०:२५-२८). एखाद्याला जगण्यासाठी मदतनीसाचा नमुना हा होय. १ करिंथ ११:१ मध्ये लिहितांना पौलाने ह्यासारखेच म्हटले आहे की, "जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा." मदतनीस उत्तेजन देतात आणि त्यांना माहीत आहे की इतरांना कशाप्रकारे येशूकडे आणावे.

देवाच्या उत्तम सेवेकरिता वडिलांनी इतरांना सुद्धा सज्ज करावे. (इफिस ४:१२). सज्ज करणे म्हणजे लोकांना फक्त काम पाहून देणे नाही तर त्याचा अर्थ असा होतो की लोकांना त्यांच्यातील ज्ञान आणि योग्यता वाढविण्यासाठी मदत करेण होय. जेव्हा प्रत्येक सदस्य योग्य प्रकारे सुसज्ज होतो आणि प्रभूसाठी कार्य करितो तेव्हा शरीर संख्येने आणि आत्मिकरितीने वाढते.

एक शेवटचे कार्य आणि सर्वात महत्त्वाचे कार्य असणारे ते म्हणजे त्याला आपण संरक्षण हे म्हणावे. जशा प्रकारे मेंढपाळ जंगली प्राण्यांपासून मेंढरांचे संरक्षण करितो, त्याचप्रमाणे, वडिलांनी अध्यात्मिकरित्या कळपाचे संरक्षण करावे. पौलाने इफिस येथील वडिलांना चेतावणी दिली की, "....क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकीही काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील म्हणून....सावध राहा" (प्रे.कृ.२०:२९-३१). वडिलांचे कार्य हे आहे की आतील आणि बाहेरील खोट्या शिक्षणापासून कळपाचे रक्षण करणे होय. ह्यासाठी फार मोठ्या धैर्याची त्याचप्रमाणे विचारविनीमय आणि इतर वेगळ्या साधारण मार्गाने खोटे सिद्धांत ओळखण्यासाठी बुध्दीची आणि ज्ञानाची गरज लागते.

वरील संपूर्ण कार्य करणे हे एक महत्त्वपूर्ण कार्य आणि अद्‌भूत जबाबदारी आहे. प्रभूसाठी काम करणे हे इतर कामापेक्षा फार श्रेष्ठ आहे. "कोणी अध्यक्षाचे काम करू पाहतो तर तो चांगल्या कामाची आकांक्षा धरितो" (१ तिमथी ३:१) आणि तो मोठ्या सम्मानासाठी आणि उत्तेजनासाठी योग्य आहे.

• • •

**मत्तय २३ मधील येशूच्या शब्दांकडे लक्ष द्या की ज्यामध्ये शास्त्री आणि परूष्यांविषयी धिक्कारांची मालिका आम्हाला आढळते. ह्या यहुदी पुढाऱ्यांनी नितीमत्वाचे उदाहरण असायला पाहिजे होते. तथापि, त्या एकाच अध्यायामध्ये आठ वेळा येशूने त्यांना ढोंगी म्हटले आहे. स्पष्टपणे हा काही आदर्श एखाद्याने अनुसरण्याचा नाही.**



# जिवंत बलिदान

**- वेन बेरियर**

"**जि**वंत बलिदान" या शब्दाच्या उल्लेखाने मनात कित्येक प्रकारचे विचार, अवधारणा आणि समज येतो. धर्माच्या या क्षेत्रात न समजणे, या कारणाने कितीतरी वेगवेगळे विश्वास होतात. पवित्रशास्त्र सांगते की ख्रिस्ती व्यक्तीने आपल्या स्वत:ला परमेश्वरापुढे बलिदानाच्या रूपात समर्पण करणे आवश्यक आहे.

रोमकरांस पत्र १२:१-२ मध्ये पौल म्हणतो की, "म्हणून बंधुजनहो, मी देवाच्या करूणमुळे तुम्हाला विनवितो की तुम्ही आपली शरीरे जिवंत पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहनीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या." हे वचन परमेश्वरासाठी समर्पणाच्या सीमेवर काही संदेह राहू देत नाही ज्याची ख्रिस्ती व्यक्तीकडून मागणी केली जाते. ख्रिस्ती व्यक्तीला परमेश्वरासाठी

आपणा स्वत:ला पूर्ण रूपाने (देह, प्राण आणि आत्मा) देणे आवश्यक आहे. असे करतेवेळी आमच्यासाठी ह्या जगातील लोक होण्याकडून त्या व्यक्तीमध्ये बदलणे आवश्यक आहे की जे परमेश्वराला स्वीकार्य आहे. "जिवंत बलिदाना"चे स्पष्ट निर्देश रोमकरास पत्र १२:२-१३:७ मध्ये दिल्या गेलेले आहेत. पहिले तर ख्रिस्ती व्यक्तीसाठी आपल्या प्रति चांगल्या व्यवहाराला वाढविणे फार आवश्यक आहे (रोमकरास पत्र १२:३-८). आम्हाला आपल्यापेक्षा श्रेष्ठ न मानण्यासाठी सांगण्यात आले आहे, परंतु गंभीरतेने विचार करायला सांगितले आहे. परमेश्वराने आमच्यामधून प्रत्येकाला वेगवेगळे दाने दिली आहे. ज्यांना दुसऱ्यांच्या दानासोबत वापरण्यात आल्यावर ती सेवा होते जिची प्रभू आमच्याकडून अपेक्षा करितो. आपल्या योग्यतेशिवाय ख्रिस्ताच्या शरीराच्या वेगळ्या केलेल्या अवयवाच्या रूपात आम्ही परमेश्वराला प्राप्त करण्याच्या अयोग्य आहोत. परंतु मिळून आमची कामे परमेश्वराच्या उद्देशाला पूर्ण करतात.

दुसरे, ख्रिस्ती व्यक्तीसाठी मंडळीत आपले भाऊ तसेच आपले सोबतच्या व्यक्तीच्या प्रति आपले उचित व्यवहार वाढविणे आवश्यक आहे (रोमकरास १२:९-२१). दुसऱ्याच्या प्रति उचित व्यवहारासाठी आवश्यक गुण असलेल्या व्यक्तीगत स्वभावामध्ये १) निष्कपट प्रेम २) वाईटाची घृणा ३) बंधुप्रीति ४) आवड ५) आशेमध्ये आनंद करणे ६) छळामध्ये धीर ७) प्रार्थनेत असणे ८) गरजवंत भावास मदत ९) अतिथ्य सत्कार १०) क्षमा करणारे मन ११) दिनता १२) सहानुभूति करण्याची योग्यता १३) शांतीप्रिय १४) बदला घेणे प्रभूवर सोडण्याची इच्छा सामील आहे. या विशेषता आढळणे (बदलण्याद्वारे) मोठ्या बलिदानाची मागणी करतो.

शेवटी बलिदानाच्या आमच्या जीवनामध्ये मनुष्याच्या सरकारी प्रबंधाप्रति चांगला व्यवहार बनविणे आवश्यक आहे (रोमकरास पत्र १३:१-७) रोमकरास पत्र १३:१ सांगते की "प्रत्येक जणाने वरिष्ठ

अधिकाऱ्याच्या अधिन असावे. कारणदेवापासून नाही असा अधिकार नाही; जे अधिकार आहेत ते देवाने नेमलेले आहेत'' मनुष्याचे सरकार प्रभूद्वारा अधिकृत आहेत. यासाठी परमेश्वराला जिवंत बलिदानाच्या रूपात आम्हाला त्यांच्या अधीन राहण्यासाठी सांगितले जाते. येशूने राज्य सरकारी म्हणजे या पृथ्वीचे नाही. यामध्ये मुख्यत: लोकांच्या आध्यात्मिक आवश्यकतेला पाहण्यात येते. मनुष्याचे प्रबंध ठरविण्याचे उद्देश आहेत. आमच्यासाठी आज्ञा मानणे, कर देणे, कस्टम देणे, सन्मान देणे आणि ज्यांना भ्यायचे आहे त्यांची भीती बाळगणे आवश्यक आहे. या आज्ञा पाळण्यासाठी पुष्कळदा मोठे बलीदान देण्याची आवश्यकता पडते. पहिल्या शतकात कित्येक ख्रिस्ती लोक सरकारच्या हाताने फार क्रुरतेने मारल्या गेले होते. त्या सरकारच्या अधिकाऱ्यांबरोबर परमेश्वर निपटून घेईल.

ख्रिस्ती होण्याच्या नात्याने आमच्यासाठी जिवंत बलीदान होणे आवश्यक आहे. यासाठी की सुवार्ता सर्व लोकांना सांगण्यात यावी. आम्ही परमेश्वराचे आहोत आणि त्याच्या सेवेसाठी उपयोगात आलो पाहिजे.

• • •

**रोमकरांस पत्र १२:१-२ मध्ये पौल म्हणतो की, ''म्हणून बंधुजनहो, मी देवाच्या करूणमुळे तुम्हाला विनवितो की तुम्ही आपली शरीरे जिवंत पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहनीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.''**

# परमेश्वराचे सामर्थ्य

**- एवन मिलोन**

**पौ**लाचा सुवार्ता प्रचाराचा उद्देश पापी लोकांना वाचविण्याचा होता (रोमकरास पत्र १:१६, थेस्सलनीकाकरास दुसरे पत्र १:८,९, करिंथकरास पहिले पत्र ८:१६,२२) मानवीय दर्शनशास्त्र, मनोविज्ञान आणि मनोचिकित्सा सर्वांची आपआपली जागा आहे. परंतु यांच्यापैकी कोणामध्येही जीवाला पाप आणि त्याच्या दोषापासून वाचविण्याचे सामर्थ्य नाही. असे शिक्षण पौलाच्या विचारात पण येऊ शकत नव्हते. तो वधस्तंभात हरवला होता. त्याच्यासाठी प्रचार करणे काही पध्दत नव्हती, परंतु संदेश होता. हा संदेश होता ''येशू आणि त्यांचे वधस्तंभावर दिल्या जाणे''. विश्वासाचे मोठे कार्य म्हणजे पवित्रशास्त्राचा बाप्तिस्मा निर्णायक आहे'' कारण तो ''त्याच्या मृत्यूमध्ये'' घेतला जातो (रोमकरास ६:३, प्रेषितांची कृत्ये २:३८, २२:१६). पापी लोकांना प्रचार करायचे असो किंवा पवित्र लोकांना शिकवण, पौलाचा संदेश वधस्तंभावरच केंद्रीत असायचा. जेव्हा पौल या गोष्टीची चिंता करतो की एक शक्तिमान भाऊ अशक्ताच्या विवेकाला जखमी करू शकतो, ह्याप्रमाणे ज्याच्यासाठी ख्रिस्त मरण पावला असा (करिंथकरास पहिले ८:११) त्याच्यासाठी विनंती करेल. जेव्हा पौल ख्रिस्ती लोकांना शारीरिक अनैतिकतेपासून दूर राहण्यासाठी समजावित आहे, तर तो त्यांना आठवण करून देतो. ''तुम्ही स्वत:चे मालक नाही, कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा'' (करिंथकरास पहिले पत्र ६:१९,२०). अनुशासनात्मक कार्यवाहीचा आग्रह करते वेळेस पौल आठवण करून देतो, ''वल्हांडणाचा यज्ञपशु जो ख्रिस्त त्याचे अर्पण झाले म्हणून आपण सण पाळावा तो जुन्या खमीराने अथवा वाईटपणा व दुष्टपणा यांच्या खमीराने नव्हे'' (करिंथकरास पहिले पत्र ५:७,८). हा आग्रह करून की ''तुम्ही मूर्तिपूजेपासून दूर पळा''

(करिंथकरास पहिले पत्र १०:१४). तो विचारतो की, "जो आशीर्वादाचा प्याला आपण आशीर्वादीत करितो तो ख्रिस्ताच्या रक्ताच्या सहभागितेचा प्याला आहे की नाही? (करिंथकरास पहिले पत्र १०:१६). प्रभू भोजनात भाग घ्यायचा खरा अर्थ हा आहे की ख्रिस्ती लोक "प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा" करितात (करिंथकरास पहिले पत्र ११:२६).

वधस्तंभाचे वचन वाचविते (करिंथकरास पहिले पत्र १:१८) आणि पवित्रशास्त्र परमेश्वराच्या प्रेरणेने दिल्या गेले आहे (तिमथ्याला दुसरे पत्र ३:१६). याचा अर्थ असा आहे की प्रचारकाने केवळ वचनाचाच प्रचार केला पाहिजे. (तिमथ्याला दुसरे पत्र ४:२). प्रचार करणाऱ्याला आपल्या पक्क्या विषयाच्या रूपात "ख्रिस्त आणि त्याचे वधस्तंभावर दिल्या जाण्यालाच" आणि आपल्या एकमात्र अधिकाराच्या रूपात परमेश्वराच्या प्रेरणेने दिल्या गेलेल्या पवित्रशास्त्रालाच मानले पाहिजे.

• • •

"जो आशीर्वादाचा प्याला आपण आशीर्वादीत करितो तो ख्रिस्ताच्या रक्ताच्या सहभागितेचा प्याला आहे की नाही? (करिंथकरास पहिले पत्र १०:१६). प्रभू भोजनात भाग घ्यायचा खरा अर्थ हा आहे की ख्रिस्ती लोक "प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा" करितात (करिंथकरास पहिले पत्र ११:२६)

# प्राचीन मार्ग

- टिम निकोल्स

**प्रा**चीन रोमने आपल्या पूर्ण साम्राज्यामध्ये रस्त्यांचे एक प्रभावशाली जाळे पसरविले. त्यामधून कित्येक रस्त्यांचा उपयोग अनेक शतकापर्यंत होत गेला. युरोपच्या आधुनिक राजमार्गाच्यामध्ये काही रूळांच्याखाली फार सावधानतेने रोमचे दगड लावल्या गेले. हे सांगणे सोपे नाही की ते दगड कोठे कोठे लावल्या गेले आहेत. कारण कित्येक ठिकाणी त्यांना झाकल्या गेले आहे आणि वाढत्या रहदारीला ध्यानात घेऊन दस्ते रूंद करण्यात आले; परंतु टुरिष्ट गाईड पर्यटकांना आठवण द्यायला विसरत नाही की ते कोठे आहेत. आताही दिसणाऱ्या त्या मूळ दगडावर चालणे आणि त्या प्रसिद्ध ऐतिहासिक लोकांची कल्पना करण्याचा प्रयत्न करणे जे ह्या रस्त्यावर चालत होते, विशेष रूपात आनंददायी आहे.



येशूने ''मार्ग आणि सत्य आणि जीवन होण्याचा दावा केला आहे (योहान १४:६). नंतर पेत्राने म्हटले आहे, ''कारण धार्मिकतेचा मार्ग समजून आल्यानंतर आपणास दिलेल्या पवित्र आज्ञेपासून परावृत्त होणे यापेक्षा तो न समजणे हे त्यास बरे होते'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२१). अक्विल्ला आणि प्रिस्किल्लाने विनम्र अपुल्लोला परमेश्वराचा मार्ग आणखीनच सविस्तर दाखविला. (प्रेषितांची कृत्ये १८:२६). पेत्रोन सांगितले की,खोटे संदेष्टे ''नाशकारक पाखंडी मते गुप्तपणे प्रचारात आणतील. ज्या स्वामीने त्यास विकत

घेतले, त्यालाही ते नाकारतील आणि आपणावर आकस्मित नाश ओढवून घेतील'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२). आणि आणखी काही अन्य बाबींमध्ये अनुवादित शब्द ''मार्ग'' ग्रीक भाषेचा शब्द hodos कडून घेतला आहे, ज्याचा अर्थ ''रस्ता''.

येशू तो मार्ग आहे जो स्वर्गात जातो. नवा करार आमचा एकमात्र नकाशा आहे. निसंशयच मनुष्याने ''सुधारणेच्या'' युगाबरोबर मूळ दगडाला मोजण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु मूळ दगड संपलेले नाही. हे मार्ग, सत्य, आणि त्या ईश्वरीय विचारांनी बनलेले आहे जे परमेश्वराच्या वचनात प्रकट केल्या गेलेले आहेत, म्हणून ते समय गेल्यामुळे जुने होत नाही. हे ''युगानुयुग स्थिर राहते'' (पेत्राचे पहिले पत्र १:२५). हा अरूंद आणि कठीण आहे, जीवनापर्यंत घेऊन जातो (मत्तय ७:१३-१७). हा शांतीचा (लूक १:७९). (रोमकरास १३:१७). प्रेमाचा (करिंथकरास पहिले पत्र १२:१). सत्याचा (पेत्राचे दुसरे पत्र २:२). आणि तारणाचा (प्रेषितांची कृत्ये १६:१७) मार्ग आहे. कित्येक वेळेस याला छळण्यात येते (प्रेषितांची कृत्ये ९:२). आणि जे लोक याला सोडतात त्यांच्यावर क्रोधीत होतो (नितीसत्रे १५:१०). परंतु हा खरा मार्ग आहे (पेत्राचे दुसरे पत्र २:१५).

जर तुम्ही ह्या मार्गावर चालू शकत नाही तर तुम्ही त्या मार्गावर असाल ज्यावर पुष्कळसे लोक जात आहेत. हा मार्ग सरळ आणि रूंद आहे (मत्तय ७:१३-१७). परमेश्वर तुम्हाला त्या मार्गावर चालण्यापासून वाचविण्यास सांगत आहे (स्तोत्रसहिता १:१; ११९:१०१). कारण तो त्या मार्गाची घृणा करिते (स्तोत्रसहिता ११९:१०४,१२८).

फार वर्षापूर्वी आम्ही एका म्हाताऱ्या प्रचारक भावाचे ऐकले होते जो आम्हाला मार्गावर येण्यासाठी सांगत होता. त्याने आम्हाला तारणाच्या खड्यापासून वाचण्यासाठी आणि दुसरीकडे नियम बनविण्याच्या खड्यापासून वाचण्यासंबंधाने चेतावनी दिली. त्याची गोष्ट ठीक होती, परंतु आमच्या वेळेसाठी यामध्ये संशोधन करायची आवश्यकता आहे. तुम्ही पाहत आहात की सडक रूंद केली गेली आहे. यामध्ये आपल्याला

ठेवण्याचा प्रयत्न करायचा अर्थ म्हणजे प्राचीन मार्गाला सोडून देणे होऊ शकते. आपल्या गोष्टीला समजण्यासाठी ''खड्डया''चा उपयोग करण्याऐवजी सडकेच्या जुन्या नकाशाला काढून येशू ख्रिस्त आणि त्याच्या शिष्यांनी बनविलेल्या मार्गावर सरळ चालावे ?

आमच्या खूप डावीकडे किंवा खूप उजवीकडे असलेल्यांना पाहून आपण परेशान व्हायला नको. परंतु त्यांनाही तो नकाशा दाखवत राहिला पाहिजे.

• • •

''नाशकारक पाखंडी मते गुप्तपणे प्रचारात आणतील. ज्या स्वामीने त्यास विकत घेतले, त्यालाही ते नाकारतील आणि आपणावर आकस्मित नाश ओढवून घेतील'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२).

# परमेश्वराच्या मंडळीची व्यवस्था

**- रॉड रूदरफोड**

मंडळीच्या व्यवस्थेसाठी ख्रिस्ताच्या मंडळ्यांमध्ये नवीन कराराच्या नमुन्याला मानल्या जाते.

प्रत्येक मंडळीचे पुढारीपण पुरूषाद्वारे केल्या जाते की ज्याला वडील बिशप, मेंढपाळ (पाळक) किंवा पाष्टर (सर्व अनेकवचनामध्ये) म्हटल्या जाते. ही नावे त्यांच्या पदासाठी आहेत. परमेश्वराची इच्छा आहे की प्रत्येक मंडळीमध्ये जसे की पुरूष परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या योग्यतेला पूर्ण करितील तेव्हाच त्यांना वडील ठरविल्या जावे. (प्रेषितांची कृत्ये १४:२३; (तिमथ्याला पहिले पत्र ३:१-७;तिताला पत्र १:५-९). हे वडील केवळ त्याच मंडळीमध्ये पुढारी आहेत जेथे त्यांना नियुक्त केल्या जाते (पेत्राचे पहिले पत्र ५:२). पवित्र शास्त्रामध्ये कोणत्याही मंडळीवर केवळ एक वडील असण्याची गोष्ट मिळत नाही. दोन किंवा दोघापेक्षा जास्त आवश्यक आहे (प्रेषितांची कृत्ये १४:२३; फिलिप्पेकरास पत्र १:१). आपल्या मार्गदर्शकाच्या रूपात परमेश्वराच्या वचनासोबत वडील लोक मंडळीचे रक्षण करतात (प्रेषितांची कृत्ये २०:२८; इब्रिलोकास पत्र १३:१७).

डिकन हे सेवक आहेत जे वडिलाच्या अधीन काम करतात (फिलिप्पेकरास पत्र १:१). सेवा करण्याआधी त्यांना परमेश्वराद्वारा दिल्या गेलेली योग्यता पूर्ण करणे आवश्यक आहे (तिमथ्याला पहिले पत्र ३:८-१३).

सुवार्तिक सुवार्ता सांगणारे आहेत. ते वडिलांप्रमाणे मंडळीमध्ये अधिकारी नाहीत. ते सेवक आहेत जे परमेश्वराचे वचन शिकवितात आणि सांगतात. ते कोणत्याही मंडळीबरोबर त्याच्या वडिलांच्या अधिन सेवा करू शकतात किंवा नवीन क्षेत्रात सुवार्ता सांगण्यासाठी पाठविल्या जाऊ शकतात (तिमथ्याला दुसरे पत्र ४:१-५, प्रेषितांची कृत्ये २१:८; ८:५-४०).

ख्रिस्ताच्या मंडळ्या मंडळीच्या व्यवस्थेसाठी नव्या करारच्या नमुन्याला मानतात, ज्या कारणाने या पृथ्वीवर मंडळीचा प्रमुख कोणीही नाही. येशू ख्रिस्त एकमात्र मंडळीचे मस्तक आहे (कलस्सैकरास पत्र १:१८; इफिसकरास पत्र १:२२-२३). मंडळीमध्ये येशूजवळ सर्व अधिकार आहे. (मत्तय २८:१८). परमेश्वराच्या योजनेमध्ये जी नवीन करारात दिल्या गेली आहे की पृथ्वीवर मंडळीचा प्रमुख होण्यासाठी कोणत्याही पोप, बिशप, चेअरमेन, मॉडरेटर किंवा कोणत्याही व्यक्तीला जागा नाही. ही जागा किंवा स्थान केवळ येशू ख्रिस्ताचे आहे.

आपल्या मंडळीच्या व्यवस्थेमध्ये परमेश्वराच्या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करणे पाप आहे (योहानाचे दुसरे पत्र ९-११, प्रकटीकरण २२:१८-१९). कोणत्याही मनुष्याला स्वयं परमेश्वराद्वारा बनविल्या गेलेल्या नियमात संशोधित करण्याचा अधिकार नाही. या आपण मंडळीसाठी येशू ख्रिस्ताच्या योजनेला मानून प्रामाणिकपणे त्याच्या मागे चालू या. केवळ असे करून आम्ही परमेश्वराचे आशीर्वाद मिळवू शकतो.

• • •

# परमेश्वराचे पुढारी कोण आहेत ?

**- डेन आर.ओवन**

**वि**श्वासाच्या समुदायात परमेश्वराचे पुढारी स्पष्ट दिसून येतात, जर त्यांचे मन परमेश्वराबरोबर योग्य आहेत. वडील आणि प्रचारक परमेश्वराचे महत्वपूर्ण पुढारी आहेत. परमेश्वराचे इतर पुरुष आणि स्त्रियाही जे परमेश्वराची सेवा करतात. ते परमेश्वराचे पुढारी आहेत. ख्रिस्ताच्या सेवाकार्याला पूर्ण करण्यासाठी आम्हाला ह्यामधून कित्येक लोक होणे आवश्यक आहे. अशा पुढाऱ्यांच्या पवित्रशास्त्रीय विशेषतेवर विचार करा.

परमेश्वराचे पुढारी ते लोक आहेत ज्यांनी ''स्वत:ला पवित्र लोकांचे सेवक होण्यासाठी ठरविले आहे.'' स्तेफनाच्या परिवाराने ख्रिस्ताची इच्छा पूर्ण करून दुसऱ्यांची सेवा करण्याचा निश्चय केला होता. प्रेम आणि दयाळूपणाचा त्यांचा व्यवहार दुसऱ्यांना दिसत होता. पौलाने बाकीच्या मंडळ्यांना म्हटले ''... अशांस आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो त्यास, तुम्ही मान्य असावे. अशी मी तुम्हास विनंती करितो'' (करिंथकरास पहिले पत्र १६:१६). परमेश्वराचे पुढारी ते असतात की ज्यांना पवित्र शास्त्र ''आत्मिक'' म्हणते. हे ते लोक आहेत ज्यांचा जीवनाच्या प्रति दृष्टिकोन परमेश्वराच्या प्रकट वचनाद्वारे बदलल्या गेला आहे. ते असे लोक आहेत जे भरकटलेल्यांना परत आणण्याचा शोध करतात आणि दुसऱ्यांचे ओझे उचलायला साहाय्य करतात (गलतीकरास पत्र ६:१-३). ते असे लोक नाहीत की ज्यांना द्वेष आणि भांडण करायला आवडते (करिंथकरास पहिले पत्र ३:१-३).

परमेश्वराचे पुढारी त्या लोकांना प्रोत्साहित करणारे असतात जे एकतेला प्राधान्य देतात. ते कोराह किंवा दियत्रीफीस किंवा त्या लोकांसारखे ढोंगी पुढारी नाहीत ज्यांनी करिंथच्या मंडळीचे गट बनविले होते. परमेश्वराचे पुढारी बर्णबासारखे आहेत की ज्यांना प्रेषितांनी ''शांतीचा

पुत्र'' हे नाव दिले होते. बर्णबाने यरूशलेमच्या मंडळीला तार्सकर शौलाचा स्विकार करायला प्रोत्साहित केले. त्याने आपल्या प्रोत्साहन आणि शिक्षणाद्वारे अंतुखियाची मंडळी तयार केली, कारण लोक त्याला पवित्र आत्म्याने आणि विश्वासाने परिपूर्ण व्यक्ती मानत होते. त्याने योहान मार्क याच्यावर विश्वास ठेविला आणि त्याच्या क्षमतेला पाहिले. परमेश्वराचे पुढारी अशा प्रकारचे लोक असतात. आम्ही तुम्हाला परमेश्वराचे पुढारी होणे आणि त्या नेतृत्वाच्या अधीन होण्यास आग्रह करतो की ज्यांचा उल्लेख वर केला गेला आहे. परमेश्वराचे लोक आध्यात्मिक प्रोत्साहन देणारे लोक आहेत जे एकतेला मोठेपण देतात आणि त्यांनी स्वत:ला पवित्र लोकांमध्ये सेवक होण्याचे ठरविले आहे. तुम्ही परमेश्वरासाठी पुढारी बनू शकता.

• • •

"... अशांस आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो त्यास, तुम्ही मान्य असावे. अशी मी तुम्हास विनंती करितो'' (करिंथकरास पहिले पत्र १६:१६).

# मंडळीचे पहिले प्रेम

**- डॉन एल नॉरवूड**

**प्र**कटीकरण २:१-७ इफिस येथील मंडळीला प्रभूचा हा संदेश देण्याच्या काळातील प्रशंसनीय गोष्टी सांगत आहे.

१) ते त्यांच्या कार्यासाठी धीराने परिश्रम करत होते.

२) त्यानी वाईटाला सहन केले नाही.

३) त्यांनी त्यांना पारखले जे प्रेषित होण्याचा दावा करीत होते.

४) त्याच्या नावामुळे त्यांच्या परिश्रमात त्यांनी हिंमत हारली नाही.

५) ते निकलाइतांच्या (लोकांचा एक समुह, जो सत्यामध्ये तडजोड करत होता आणि अनैतिकतेचे समर्थन करीत होता) कामाची घृणा करीत होते. तरी त्यांनी त्यांचे पहिले प्रेम सोडले होते.

प्रभू हे का म्हणत होता की त्यांनी त्यांचे पहिले प्रेम सोडले होते ?

कोणत्या सिद्धांतामध्ये तरी हे खरे असू शकेल. परंतु त्यांची इच्छा परमेश्वर आणि मनुष्य जातीसाठी खरे प्रेम नाही तर त्याचा त्यांना काही लाभ होणार नाही (करिंथकरास १ ले पत्र १३:१-३, योहानाचे पहिले पत्र ४:१२-१३; ५:१-२). इफिसचे लोक प्रभु आणि त्याचे कार्यासाठी उत्सुक होते, परंतु त्यांनी हरविलेले आणि अडचणीत पडलेले विश्वासूंची काळजी सोडली होती.

आपण सिद्धातामध्ये खरे असू शकतो आणि होऊ शकते की अविश्वासी भटकलेले बंधुना तुच्छ मानू. जर आपण प्रभूशी खरे संबंध ठेवू इच्छितो तर आपल्याला असे करायला नको. आपल्याला माहीत आहे की, प्रकटीकरणाच्या पहिल्या अध्यायात योहानाने प्रभूला पाहिले होते. त्याच्या उजव्या हातात सात तारे होते आणि तो सोन्याच्या सात

समयामध्ये होता (प्रकटीकरण १:१२-१३,२०). ते सात तारे सातही मंडळ्यांचे दूत आहेत आणि सात समया मंडळ्या आहेत. इफिस याच मंडळ्यामधून एक होती. जर ते पश्चाताप करून आपल्या पहिल्या प्रेमाकडे वापस आले नसते तर प्रभूने त्या समयीला काढून टाकले असते (प्रकटीकरण २:५). याचा अर्थ असा की त्यांचा नेहमीसाठी नाश झाला असता.

पौलाने समजावले आहे की, ख्रिस्ती व्यक्तीने "भांडू नये, तर त्याने सर्वांबरोबर सौम्य, शिकविण्यात उत्सुक, सहनशील, विरोध करणाऱ्यांस सौम्यतेने शिक्षण देणारा असे असावे, कदाचित देव त्यास सत्याचे ज्ञान होण्यासाठी पश्चातापी मन देईल आणि सैतानाने आपल्या इच्छेस वश होण्याकरिता धरिलेले लोक त्याच्या पाशातून सुटून शुद्धीवर येतील" (तिमथ्याला दुसरे पत्र २:२४-२६).

ख्रिस्ती व्यक्तीने "भांडू नये, तर त्याने सर्वांबरोबर सौम्य, शिकविण्यात उत्सुक, सहनशील, विरोध करणाऱ्यांस सौम्यतेने शिक्षण देणारा असे असावे, कदाचित देव त्यास सत्याचे ज्ञान होण्यासाठी पश्चातापी मन देईल आणि सैतानाने आपल्या इच्छेस वश होण्याकरिता धरिलेले लोक त्याच्या पाशातून सुटून शुद्धीवर येतील" (तिमथ्याला दुसरे पत्र २:२४-२६)

• • •

# एक तयार घर

**- टोनी लक्षी**

इंग्रजी भाषेचे काही शब्द आहेत की ज्याकडून उदासपणाची भावना येते. एकटेपणा त्यामधला एक शब्द आहे, सहानुभूती आणि करूणेच्या भावनेला वाढविणारा शब्द ''बेघर'' आहे. याहीपेक्षा उदास करणारी गोष्ट तेव्हा होते जेव्हा घर तर आहे किंवा तयार आहे परंतु ज्यांना याची आवश्यकता आहे त्यांना त्याची माहीती नाही ते त्याची पर्वा करत नसतील.

पवित्र शास्त्र काही घराची गोष्ट करते, जे तयार केल्या गेले आहे. एदेन बागेला (उत्पत्ती २:८-१७). मनुष्याच्या पहिल्या घराच्या रूपात तयार केल्या गेले होते. जसे कोणी म्हटले आहे ''आदामासाठी, स्वर्ग लोकच त्याचं घर आहे. त्याच्या संतानाच्या चांगल्यासाठी घर स्वर्ग आहे.'' उधळ्या पुत्रा (लुक १५:११-३५), जवळ एक तयार घर होते, परंतु त्याने ते सोडून दिले. 'द ब्रुक क्रेरियोथ' नावाच्या पुस्तकात जॉर्ज मुरने लिहिले आहे, ''मनुष्य ज्याचा त्याला शोध आहे व ज्याची त्याला आवश्यकता आहे त्यासाठी जगाची चक्कर लावतो, आणि त्याला प्राप्त करायला घरी येतो. सैनिकाच्या परेड मार्च मध्ये वापरण्यात येणाऱ्या गीताच्या ओळीची मला त्याची आठवण आहे. ''तुमच्याजवळ चांगले घर होते परंतु तुम्ही सोडून दिले.''

एक आणखी तयार घर ज्याची गोष्ट केल्या गेली आहे. त्याला येशूने तयार केले होते. येशू आम्हाला त्याच्यासोबत राहायला बोलवत आहे, ''माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत'' (योहान १४:२). सर्वात मोठं घर ज्याची कोणी कल्पना करू शकतो ते परमेश्वराच्या लेकरांसाठी तयार केलेले घर आहे. करिंथकरास २ रे पत्र ५:१-९ मध्ये

पौल देवाबरोबर राहण्याची गोष्ट करीत आहे. ''राहणे'' शब्द ग्रीकमध्ये endemeo तून काढला आहे आणि याचा मूळ अर्थ आहे ''आपल्या लोकांमध्ये असणे'' उपदेशक १२:५ म्हणतो ''कारण मनुष्य आपल्या अनंतकालिक निजधामास जाईल.'' काय या गोष्टीची माहिती होणे फार चांगली गोष्ट नाही, की एक तयार घर आमची वाट पाहत आहे?

एक शेवटची गोष्ट ! येशू म्हणतो की आम्हाला स्वत:ला घरासाठी तयार करायचे आहे जे आमच्यासाठी बनविण्यात आले आहे. मत्तय ७:२४-२७ मध्ये तो आम्हाला आपले जीवन त्या खडकावर बनवायला सांगतो ज्याचा पाया पक्का आहे आणि तो पाया स्वत: येशू ख्रिस्त आहे तुम्ही तुमचे घर कोणत्या पायावर बनवित आहात?

• • •

इंग्रजी भाषेचे काही शब्द आहेत की ज्याकडून उदासपणाची भावना येते. ''एकटेपणा'' त्यामधला एक शब्द आहे, सहानुभूती आणि करूणेच्या भावनेला वाढविणारा शब्द ''बेघर'' आहे.

# कृपेने तारण

- क्लेओन लाइल्स

"तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही, तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही" (इफिस २:८-९).

कित्येक वेळेस पवित्र शास्त्रातील सोप्या गोष्टीला समजणे फार कठीण होते. असे यासाठी होते की, त्यावर पुष्कळशा अडचणीचा ढिग लागलेला असतो. मनुष्याच्या शिक्षणाला काढणे आणि पवित्र आत्म्याच्या स्पष्ट गोष्टींना समजणे कठीण आहे.

कृपेचा अर्थ आहे समर्थन-या कारणाने जर आमचे तारण परमेश्वराच्या कृपेने झाले आहे तर आमचे तारण परमेश्वराच्या समर्थनाने झाले आहे. परमेश्वर आमच्या बचाव करू इच्छितो. आमच्या तारणाच्या दिशेने उचललेले पाऊल त्याच समर्थनाच्या कारणाने होते. या कारणाने कृपा ती दया आहे जिला कमविल्या गेले नाही.

आम्ही आपल्या स्वत:चे तारण करू शकत नाही. परमेश्वरासमोर चांगले काम जोडणे असंभव आहे. त्यामध्ये परमेश्वराद्वारे स्वीकृत करण्यासाठी आम्ही काही पण करू, तरी आमचे तारण कृपेनेच होतो. ही गोष्ट या तथ्याला नाकारत नाही की, काही काम करणे आवश्यक आहे. परमेश्वराच्या कृपेला स्वीकार करण्यासाठी त्याच्या इच्छा जाणून घ्यायची फार आवश्यकता आहे.परंतु हे करूनही आम्ही निरूपयोगी दासच आहोत. आमचा उद्धार परमेश्वराच्या कृपेनेच झाला पाहिजे. यासाठी जे काही आपल्याला करायला सांगितले ते करणे आम्हाला कोणत्याही प्रकारे आमच्यासाठी उपलब्ध केल्या गेलेल्या परमेश्वराच्या तारणाला मिळविलेला बनवत नाही.

जेव्हा मन चांगले आहे तर सर्व काही चांगलेच होईल. निश्चितरूपाने आम्ही तेच करू जे आम्हाला करायला सांगितले आहे. जेव्हा आपण आमच्या कर्माला लक्षात ठेवून विचार करतो आणि विसरून जातो की आमचे तारण परमेश्वराच्या कृपेने झाले आहे, तेव्हा मन चांगल्याप्रकारे काम करत नाही.

या वचनात या गोष्टीवर ध्यान द्या की, तो म्हणतो की आपले तारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे झाले आहे. पुष्कळ वेळेस कर्म करण्यासाठी विश्वास कोठे जातो. परमेश्वराला भावणारा विश्वास तोच करतो जे परमेश्वर करायला सांगतो, ते केल्यानंतर म्हणतो आम्ही त्याच्या कृपेवर अवलंबून आहे. तो आमचा स्वीकार करतो कारण मन शुद्ध आहे आणि त्याच्या आज्ञेला मानणे हे आमच्या विश्वासाला दाखवते, सिद्ध बनविते. याप्रकारे जेव्हा आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याच्या इच्छेचे पालन करितो, तेव्हा आमचे तारण कृपेने होते. आम्ही तारणाला कमवत नाही, परंतु आम्ही आमच्या विश्वासासाठी आवश्यक अटी पूर्ण केल्या आहेत.

• • •

"तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही, तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही" (इफिस २:८-९).

# इच्छेद्वारे बाप्तिस्मा

**- ई.क्लाऊडे गार्डनर**

**दू**रदर्शनवरील एका प्रसिद्ध व्यक्तीने विधान केले की बाप्तिस्मा ऐवजी "इच्छेद्वारे बाप्तिस्मा" हा सिद्धांत असायला हवा. जर एखादा व्यक्ती बाप्तिस्मा घेण्यास अपयशी ठरला तर चांगले जीवन आणि चारित्र्याद्वारे, त्याच्यासाठी "इच्छेद्वारे बाप्तिस्मा" त्यासमानच असेल, माझ्यासाठी नवीन असलेली ही कादंबरी आणि पाखंडी सिद्धांत होता. सरळ आणि सोपी देवाची आज्ञा नाकारण्यासाठी विश्वास ठेवण्यास कठीण अशा अनेक खोट्या कल्पना जोडण्यात आल्या आहेत.

आदरनीय मार्शल किबल हे म्हणत असत की, "पवित्र शास्त्र बरोबर आहे" आणि बाप्तिस्म्याविषयी ही हेच सत्य आहे. बाप्तिस्म्याविषयी खऱ्या असलेल्या बाबी खाली दिलेल्या आहेत.

| |
|---|
| स्पष्टपणे फक्त "इच्छे" पेक्षाही<br>बाप्तिस्म्याला काही अधिक हवे आहे. |

हे पापापासून तारिते. "जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल" (मार्क १६:१६).

ही आज्ञा दिलेली आहे. "पेत्र त्यांना म्हणाला, पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल." (प्रे.कृ.२:३८) "मग येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्याने आज्ञा केली..." (प्रे.कृ.१०:४८).

हे पापांच्या क्षमेसाठी आहे. "तर आता उशीर का करितोस? उठ, त्याच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या पातकांचे क्षालन कर" (प्रे.कृ.२२:१६).

हे तारिते आणि शुद्ध भाव निर्माण करिते. "त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्याद्वारे तुमचे तारण करीत आहे. त्याचा अर्थ केवळ देहाचा मळ धुवून टाकणे नव्हे तर शुद्ध भावाने देवाचे ऐकणे असा आहे" (१ पेत्र ३:२१).

हे नंतर एखाद्याची ख्रिस्ताच्या मंडळीत भर घालिते. "....आणि प्रभू तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे" (प्रे.कृ.२:४७).

हे शिंपडणे नव्हे, बुडणे आहे."किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला. ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे" (रोम ६:३-४).

हे नवीन जन्मामध्ये अत्यावश्यक आहे. "येशू त्याला म्हणाला, मी तुम्हाला खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही' (योहान ३:५).

हे एखाद्याला बाप्तिस्म्यानंतर "आनंद" करण्यासाठी समर्थ करीते. "मग ते पाण्यातून वर आले तोच प्रभूचा आत्मा फिलिप्पाला घेऊन गेला म्हणून तो पुन्हा षंढाच्या दृष्टीस पडला नाही, नंतर तो आपल्या वाटेने हर्ष करीत चालला" (प्रे.कृ.८:३९).

हे एखाद्याला तारणाऱ्या ख्रिस्तामध्ये ठेविते. "कारण तुम्ही सर्व ख्रिस्त येशूवरील विश्वासाच्या द्वारे देवाचे पूत्र आहा. कारण तुम्हामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला


परिधान केले आहे'' (गलती ३:२६-२७).

स्पष्टपणे फक्त ''इच्छे'' पेक्षाही बाप्तिस्म्याला काही अधिक हवे आहे. बाप्तिस्म्याला नाकारून आणि त्याऐवजी ''पापी लोकांची प्रार्थना'' फक्त विश्वास, चांगली नैतिकता किंवा बंधुभाव त्याजागी ठेवू शकत नाही. तुम्ही उशीर का करीता ?

• • •

## तुम्हाला माहीत आहे का ?

''एक्लेसिया'' हा एक ग्रीक शब्द आहे ज्याचे भाषांतर नव्या करारात ''मंडळी'' असे करण्यात आले आहे. हा शब्द ११५ वेळेला आलेला आहे. मुख्यत: प्रेषितांच्या कृत्ये यामध्ये.



# जागे होण्यापूर्वी जर मी मरण पावलो...

- स्टिव्ह हिगीन बॉथम

**जे**व्हा मी बालक होतो, तेव्हा ही प्रार्थना माझ्या पालकांनी मला शिकविली. तुमच्याही पालकांनी असेच केले होते काय? तुम्हाला माहीत असेल की, पाठ केलेली लेकरांची प्रार्थना खूप वेळा ह्या प्रकारची असते.

निद्रेमध्ये मी मला आता घेऊनी जातो
रक्षी आत्म्याला मी प्रभुदा प्रार्थितो
जागे होण्यापूर्वी जर मी मरण पावलो
स्वीकार मज आत्म्याला प्राथितो मी प्रभूला

तुम्ही जागे होण्यापूर्वी मरणे ही शक्यता सुचितार्थाने भरलेली आहे. तरीसुद्धा मुख्य उद्देश हा आहे की, '' तुम्ही मरणासाठी तयार आहात का? तुमची सार्वकालिकता सुरक्षित आहे? प्रश्न चांगले आहे. विशेषत: दिवसाच्या अशा वेळेत जेव्हा तुमची गती मंद होते, तेव्हा वेळ

घ्या व गेलेल्या दिवसाकडे पहा आणि देवाच्या समोर तुमच्या श्रेणींचे मूल्यांकन करा. जर तुम्ही जागे होण्याआधीच मृत्यू पावला तर काय? सर्व काही चांगलेच असेल का? आपण सर्व चांगलेच करू हाच प्रश्न संभव्यपणे स्वत:लाच विचारा, पण ह्या क्षणामध्ये ज्यावर मला तुम्हाला केंद्रीत करायला पाहिजे तो हा प्रश्न नाही.

मला लहानसा प्रश्न तुम्हाला विचारायला आवडेल की जर तुम्ही संभाव्य परिणामाची तयारी करून "जागे झालात" तर ? ही एक 'ख्रिस्तामध्ये मरण्याची" तयारी आहे. आणखी ही दुसरे म्हणजे "ख्रिस्तासाठी जगण्याची" तयारी आहे. जर तुम्ही जागे होण्यापूर्वी मृत्यू पावले नसाल तर तुम्ही कोणती तयारी केली आहे? तुमचा वेळ, कौशल्य आणि शक्ती देवाच्या सेवेसाठी खर्च करण्याची योजना आणि तयारी तुम्ही कशी केली आहे?

जर तुम्ही मरण्याऐवजी जागे झालात तर तुम्ही उद्याचा दिवस कसा उपयोगात आणाल ? कोणत्या योजना तुम्ही आखल्या आहेत ? काय तुमच्या योजनामध्ये देवाच्या राज्याचा समावेश आहे? काय तुमच्या योजनांचे परिक्षण करून तुम्ही येशूचे शिष्य आहात हे निश्चित करणे एखाद्याला शक्य होईल काय?

जर तुम्ही मरण्याऐवजी तुम्हाला जाग आली आणि आणखी एक दिवस तुम्हाला मिळाला तर तुमच्या वेळेचे तुम्ही काय कराल? काय सुवार्ता करण्याबाबत काही विशेष योजना तुमच्याजवळ आहेत ? एखाद्या गरजू व्यक्तीची येशूच्या नावामध्ये सेवा करण्याची विशेष योजना तुम्हाजवळ आहे का? ज्यांच्यासाठी तुम्ही प्रार्थना करीत आहात आणि त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करी आहात, त्यासाठी तुम्हाजवळ विशेष माहिती आहे का? तुमच्या स्थानिक मंडळीला बळकट करण्यासाठी आणि तिची उत्तम सेवा करण्यासाठी तुमच्याकडे योग्य विचार आहेत का?

मित्रांनो, जोपर्यंत एखादा "ख्रिस्तामध्ये जगण्याची" तयारी करत नाही तोपर्यंत तो "ख्रिस्तामध्ये मरण्याची" परिपूर्ण तयारी करू शकत नाही असे खरोखर मला वाटते. ख्रिस्तामध्ये मरण्याची तयारी करीत असताना एखाद्याला ख्रिस्तामध्ये जगणे आवश्यक आहे.

ह्याकरिता प्रश्नाकडे वापस येवू या. "जर जागे होण्यापूर्वी तुम्ही मरण पावला तर तुम्हासोबत काय घडू शकेल ?" ह्या प्रश्नाच्या पलीकडे जरी हा सारखाच महत्त्वाचा प्रश्न आहे " मरण येण्यापूर्वीच तुम्हाला जाग आली तर काय?" जागे होण्यापूर्वी तुम्ही मरण पावला तर तुमच्या आत्म्याला घेऊन जा ही प्रार्थना मी प्रभूला करेल. पण जर तुम्ही मरण्याआधी जागे झालात, तर मग काय?

• • •

## विचार करा..

- जर तुम्ही मरण्याऐवजी जागे झालात तर तुम्ही उद्याचा दिवस कसा उपयोगात आणाल ?
- कोणत्या योजना तुम्ही आखल्या आहेत ?
- काय तुमच्या योजनामध्ये देवाच्या राज्याचा समावेश आहे?
- काय तुमच्या योजनांचे परिक्षण करून तुम्ही येशूचे शिष्य आहात हे निश्चित करणे एखाद्याला शक्य होईल काय?

# स्त्रीचे महत्त्व तिच्या स्वत:च्या आत

**- बेट्टी बर्टन चोट**

"परमेश्वर देवाने सर्व वनपशु आणि आकाशातील सर्व पक्षी हे मातीचे घडल्यावर आदाम त्यास कोणते नाव देतो हे पाहावे म्हणून त्याजकडे ते त्याने नेले, तेव्हा आदामाने प्रत्येक सजीव प्राण्याला जे नाव दिले तेच त्याचे नाव पडले. आदामाने सर्व ग्रामपशु, आकाशातील पक्षी व सर्व वनपशु यास नावे दिली पण त्यामध्ये त्याला अनुरूपसा कोणी सहकारी मिळाली नाही" (उत्पत्ती २:१९-२०).

"मग परमेश्वर देव म्हणाला, मनुष्य एकटा असावा हे बरे नाही, तर त्याला अनुरूपसा सहकारी मी निर्माण करीन" (वचन १८).

"मग परमेश्वर देवाने आदामावर गाढ निद्रा आणिली आणि तो निजला तेव्हा त्याची एक फासळी काढून घेतली, तिची जागा मांसाने भरून आली. परमेश्वर देवाने आदामाची फासळी काढून तिची स्त्री बनविली आणि तिला आदामाकडे नेले, तेव्हा आदाम म्हणाला, आता ही मात्र माझ्या हाडातले हाड व मांसातले मांस आहे. हिला नारी म्हणावे. कारण ही नरापासून बनविली आहे"(उत्पत्ती २:२१-२३).

"आदामाने आपल्या बायकोचे नाव हव्वा ठेविले. कारण ती अवघ्या जीवधारी जनांची माता होय" (उत्पत्ति ३:२०).

आपण मनामध्ये फार वर्षे मागे जाऊन त्या पहिल्या मानवीय दंपत्तीची कल्पना करू शकतो काय? त्यांचा काय संबंध होता? स्त्री आदामाच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी बनविण्यात आली, व तसेच त्याची गुलाम होती काय? काही संस्कृतीमध्ये स्त्रीची हीच भूमिका आहे. परंतु परमेश्वराने हे अपेक्षिले होते काय?

जगातील कोणत्याही क्षेत्रामध्ये असले काहीच नोंद नाही की

परमेश्वराने दुसऱ्याला बनविण्यासाठी एका जिवंत प्राण्याला घेतले होते. या गोष्टीत हव्वा सर्वात निराळी होती. मनुष्य जातीच्या संबंधात परमेश्वराने स्वत: म्हटले "आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण तयार करू " (उत्पत्ती १:२६). म्हणून आदामाला भूमीच्या मातीपासून परंतु परमेश्वराच्या स्वरूपात बनविल्या गेले होते.

परंतु स्त्रीला आदामाची फासळी काढून बनविल्या गेले होते. या गोष्टीत सर्व सृष्टीपासून ती वेगळी आहे कारण तीला जिवंत प्राण्याच्या रूपात परमेश्वराच्या स्वरूपात बनविल्या गेले. परंतु आदामाच्या सोबत एक शरीर पण.

हव्वाची भूमिका काय होती ? परमेश्वराने तिला "मनुष्याशी मिळतीजुळती" म्हटले. ती आदामाची परिपूर्णता होती. ज्याप्रकारे प्रसवतेचा एक भाग पुरुषांमध्ये आणि दुसरा स्त्रीमध्ये टाकला, त्याचप्रमाणे पुरुष आणि स्त्री एक दुसऱ्याबरोबर पूर्ण होतात. पुरूषाची शक्ती आणि आपल्या परिवाराची आवश्यकता पूर्ण करण्याची त्याच्या योग्यतेबरोबर स्त्रीची कोमलता आणि घर बनविण्याचे गुण मिळतात. पुरुष समाजाबरोबर काम करण्यासाठी बाहेर जातो; स्त्री घर बनविण्यासाठी आपला जोर लावते आणि याप्रकारे परिवार मजबूत होते. जेणेकरून येणाऱ्या पिढीचे मजबूत भावनात्मक परिवार बनतात. आध्यात्मिक रूपात पुरूष परमेश्वराची आराधना करण्याचा मार्ग दाखवतो, जेव्हा की स्त्री दररोज घरामध्ये लेकरांना भक्तीने भरलेले जीवन जगण्यासाठी शिकवते.


स्त्रीच्या भूमिकेसाठी पवित्रशास्त्रात एक शब्द वापरण्यात आला आहे की ती साहाय्यक आहे. पुरुषाला संपूर्ण करण्यास योग्य व्यक्तीच्या रूपात. परमेश्वराने अपेक्षिले की हव्वा जशी पण आहे होवू शकते की आदामाबरोबर त्याची सहायता करायला तयार भागीदारी बनवावी. जर आजच्या स्त्रिया आपल्या पतीबरोबर या प्रकारे व्यवहार करायला लागतील तर पुष्कळशा परिवाराच्या कुटुंबांच्या समस्या आपोआपच समाप्त होतील.

आमच्या घरामध्ये शांती, समर्थन तसेच राहील जशी परमेश्वराने त्याची योजना बनविली होती.

याबरोबर निसंशय हव्वेला समजले की, ती परमेश्वराबरोबर सरळ संबंधाची स्वतंत्र जीव आहे. काइनाच्या जन्म झाल्यावर हव्वा म्हणाली, "परमेश्वराच्या साहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे" (उत्पत्ती ४:१). तिच्या गोष्टीचे शब्द प्रत्येक स्त्रीसाठी आदर्श आहे. तिने मानले की परमेश्वराने उपहार भेट दिली आहे, जो या बाबतीत एक पूत्र होता आणि त्याची प्राप्तकर्ता हव्वा स्वत: होती. देणारा आणि प्राप्त करणारा दोघंही ओळखल्या जाऊ शकतात. हव्वेने परमेश्वराच्या नजरेत आपले संबंध आणि महत्वाला आणि घर बनविण्यासाठी आपल्या भूमिकेला समजले. आजपण काळानुसार आपल्या आदिमातेपासून दूर आहेत; परंतु तिची नक्कल करून त्या चांगल्या करतील.

• • •

परंतु स्त्रीला आदामाची फासळी काढून बनविल्या गेले होते. या गोष्टीत सर्व सृष्टीपासून ती वेगळी आहे कारण तीला जिवंत प्राण्याच्या रूपात परमेश्वराच्या स्वरूपात बनविल्या गेले. परंतु आदामाच्या सोबत एक शरीर पण.



# वैयक्तिक सुवार्ता प्रसार आणि तुम्ही

**- जॉर्ज एक्पबली**

**सु**वार्ता प्रसार असा विषय आहे ज्यावर आमच्यापैकी कित्येक जण बोलले आणि अनेक वेळेस त्यावर शिकवितांना ऐकले आहे. कित्येक प्रचारक पापी लोकांना सुवार्ता सांगण्याच्या कार्याला जाण्याच्या ऐवजी सुवार्ता प्रसार या विषयावर शिकवणे पसंत करतात. पुष्कळ चांगले ख्रिस्ती बुद्धीमत्तेला घाबरतात. ते कुटुंबातील खरोखर चांगले लोक, आपल्याबरोबर काम करणारे यांना शिकविण्याची हिंमत करत नाही; जे निश्चित रूपात नरकाच्या आगीकडे ओढल्या जात आहेत. असेच ख्रिस्ती लोकांची बहुसंख्या सुवार्ता प्रसार म्हणजे सुवार्ता सांगण्याला ख्रिस्ती जीवनाच्या भागाच्या रूपात पाहत नाही. किती दु:खाची गोष्ट आहे ! आणि कोणता मार्गच नाही. आम्हाला सुवार्ता सांगावीच लागेल.

आम्ही सुवार्ता सांगण्याचे काम पगार घेणाऱ्या प्रचारकावर टाकले आहे. दु:खद गोष्ट आहे, की त्यामधून अधिक लोग मंडळीच्या प्रबंधामध्ये

तसेच मंडळीच्या चांगल्या कामामध्ये इतके व्यस्त आहेत की सुवार्ता सांगण्यासाठी त्यांच्या जवळ वेळ नाही. नव्या करारात, पुढारी आणि मंडळीतील लोक दोघेही हरवलेल्यास शिकवण्याच्या कार्यात गंभीरपणे व्यस्त असत (प्रेषितांची कृत्ये ८:४, १४, १५, २५). एकदा मी एका प्रचारकाला हे सांगताना ऐकले "आम्ही तारणासाठी नव्या कराराची योजना मुक्त केली आहे, परंतु त्या मुक्त योजनेला पसरविणाऱ्या नवीन कराराच्या आत्म्याला मुक्त करू शकलो नाही." मी त्याजबरोबर सहमत आहे. तेव्हापासून मी स्वत:ला विचारत आहे की आम्ही नवीन कराराच्या वेळेसारखे हरवलेल्यांना समजावण्यासाठी जोर का लावत नाही.

प्रेषितांची कृत्ये ५:४०-४२ आणि प्रेषितांची कृत्ये ६ मध्ये त्यांच्या तत्काळ झालेल्या परिणामाला पाहा. ज्यामध्ये म्हटले आहे "त्या दिवसात शिष्यांची संख्या वाढत गेली "शिष्याची संख्या वाढण्याचे कारण होते की "आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकविण्याचे व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडले नाही" "जेव्हा वचन सांगण्यात येते तेव्हा लोकांमध्ये धार्मिक जागृती येते, जेणेकरून आणखी लोक ख्रिस्ती बनतात" (प्रेषितांची कृत्ये ११:१९-२१). प्रभूची बहुमूल्य मंडळी तेव्हाच वाढेल जेव्हा आम्ही हरवलेल्यामध्ये अधिकाधिक वचन सांगू.

आम्ही सुवार्ता प्रसार म्हणजे सुवार्ता सांगण्यास निष्काळजी असायला नको. संभावना आहे की, प्रभूची सुवार्ता सांगण्याची आज्ञा न पाळल्याच्या कारणाने तुमचा आत्मा अडचणीमध्ये येईल.

पुष्कळ लोकांना माहीत नाही की सुवार्तेच्या परिस्थितीमध्ये काय गोष्ट करावी. आम्ही खाली हरवलेल्यांना सुवार्ता सांगण्यास आरंभ करण्यासाठी तुम्हाला प्रेरणा मिळण्यासाठी काही वास्तविक आणि सरळ सूचना देत आहोत.

१) लोकांना सांगा की ख्रिस्ती होण्यासाठी तुम्ही काय केले. हे खूप सोपे असायला पाहिजे; जर तुम्हाला माहीत आहे की ख्रिस्ती होण्यासाठी

तुम्ही काय केले आहे. नाही तर तुम्ही आता शिकून दुसऱ्यांनाही तसे करण्यासाठी सांगा.

२) जे काही ख्रिस्ताने तुमच्यासाठी केले ते फार उत्साहाने सांगा, काय ख्रिस्ताने तुमच्या जीवनात नवीन दिशा दिली आहे? तर त्याबद्दल लोकांना सांगा. जर सुवार्ता चांगली बातमी आहे, आणि ती आहे तर ती सांगण्यात यावी. याप्रकारे जीवन जगा की लोक तुमच्या जीवनात येशूला पाहू शकतील.

३) असे जीवन जगा की तुमच्या जीवनात लोक येशूला पाहू शकतील. शाईने नव्हे तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने कोरलेले दगडी पाट्यावर नव्हे तर मासमय अंत:करणरूपी पाट्यावर कोरलेले आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र असे तुम्ही प्रसिद्ध आहा. (दुसरे करिंथकरास पत्र ३:३, पेत्राचे पहिले पत्र ३:१). चांगला प्रभाव दाखवा की लोक तुमचे जीवनाचे अनुसरण करण्याची इच्छा करतील. ख्रिस्ताकडून आदर्श बना. जास्त वेळ झाला नाही की आमच्या आराधना सेवेत दोन स्त्रिया आल्या, त्यांना सभासद होण्याची इच्छा दर्शविली, कारण त्यांना एका तरूण महिलेच्या आकर्षित जीवनाला पाहिले होते. पाहिलो तर तिने या दोघींना यासाठी परिवर्तीत केले कारण त्यांनी तिच्या जीवनात येशूला पाहिले आणि दुसरे कारण तिने त्यांना सांगितले की, येशू त्याचे जीवन बदलू शकतो.

४) मंडळीला मजबूत करा

जेव्हा तुम्हाला संधी मिळेल तेव्हा लोकांना उपासनेमध्ये बोलवा. त्यांना सांगा की ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये तुम्हाला फरक मिळेल. आपल्या गैर ख्रिस्ती मित्रांना शिकविल्या जाणारे महान घडे शिकवा आणि त्यांना येण्यास सांगा. तुमच्या मंडळीमध्ये होणाऱ्या सुवार्तेच्या विशेष सभांबद्दल लोकांना सांगा. त्यांना नवीन येणाऱ्यांच्या विशेष स्वागताबद्दल सांगा.

जर तुम्ही तुमच्या जीवनामध्ये आजपर्यंत कोणाला सरळ आणि व्यक्तीगत रूपाने ख्रिस्तामध्ये बदललेले नाही, तर तुम्ही तुमच्या जीवनामधील सर्वात मोठ्या एका आनंदाला विसरत आहा. जो पर्यंत माझी गोष्ट आहे त्याप्रमाणे पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल देवाच्या दूतासमोर आनंद होतो हे मी तुम्हाला सांगतो (लूक १५:१०).

आम्ही फार गंभीरतेने अपेक्षा बाळगतो की तुमचे कुटुंब आणि तुमच्या मित्रामध्ये सुवार्ता सांगणे सुरू करा.


• • •

"आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकविण्याचे व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडले नाही" "जेव्हा वचन सांगण्यात येते तेव्हा लोकांमध्ये धार्मिक जागृती येते, जेणेकरून आणखी लोक ख्रिस्ती बनतात" (प्रेषितांची कृत्ये ११:१९-२१).

# सुवार्ता पोहचविण्याचा उत्साह

- टोनी डब्ल्यू. बॉयड

**ये**शू हरवलेल्यावर प्रेम करत होता आणि त्याच्या तारणाचा इतका इच्छुक होता की मनुष्य रूपात राहण्यासाठी तो स्वर्ग सोडून आला. (फिलिप्पैकरास पत्र २:१-११). परमेश्वराच्या न्यायाची मागणी होती की पापाचे वेतन मरण आहे (रोमकरास पत्र ६:२३), आणि येशूने वधस्तंभावर स्वत:ला देऊन आमचा पापांचा दंड स्वत:वर घेतला (इब्री लोकास पत्र ९:१२-२८). येशूने सांगितले की पृथ्वीवर येण्याचे त्याचे कार्य ''हरवलेले शोधावयास व तारावयास'' होते (लूक १९:१०) यासाठी तो जन्मला आणि यासाठी मरण पावला की आमचे तारण विकत घेऊ शकेल.



प्रेषित पौलाने म्हटले, ''माझ्या अंत:करणात मोठा खेद व वेदना आहेत. कारण माझे बंधुजन म्हणजे देहसंबंधाने माझे गोत्रज ह्यांच्यासाठी मी स्वत: ख्रिस्तापासून शापभ्रष्ट व्हावे, अशी इच्छा कराविशी वाटली (रोमकरास पत्र ९:२-३).

याशिवाय ''बंधुजनहो, त्यांच्याविषयी माझी मनीषा व देवाजवळ विनंती अशी आहे की त्यांचे तारण व्हावे'' (रोमकरास

पत्र १०:१). पौलाची अभिलाषा इच्छेपेक्षा मोठी होती. वास्तविक तो या ओझ्याला व्यक्तिगत रूपात समजत होता. "जरी मी सुवार्ता सांगतो तरी मला प्रतिष्ठा मिरविण्याचे कारण नाही, ती सांगणे मला प्राप्त आहे. मी सुवार्ता सांगत नाही तर मला धिक्कार असो, दुर्बळास प्राप्त करून घेण्यासाठी मी दुर्बळास दुर्बळ झालो, मी सर्वांसाठी सर्व काही झालो आहे, यासाठी मी कसे तरी कित्येकांचे तारण साधावे" (करिंथकरास पहिले पत्र ९:१६,२२). पौलाचा विचार होता " तेव्हा पौलाने उत्तर दिले, तुम्ही रडून माझे मन खचविता हे काय? मी नुसता बंधनात पडण्यासच नव्हे, तर प्रभू येशूच्या नामासाठी यरूशलेमात मरावयास देखील तयार आहे" (प्रेषितांची कृत्ये २१:१३). "कारण आता माझे अर्पण होत आहे आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे (तिमथ्याला दुसरे पत्र ४:६).

प्रत्येक ख्रिस्ती आपल्या अनंत भविष्यासाठी येशूचा, ज्याने स्वर्गापर्यंत पोहचणे सोपे केले...प्रेषितांचा (पौलासह) ज्यानी वचन सांगितले यासाठी की आम्हाला स्वर्गाचा मार्ग दिसावा आणि हे की तेथपर्यंत कसे पोहचता येईल; प्रत्येक व्यक्तीचा जिच्यामध्ये इतके प्रेम होते की त्याने पापाच्या परिणामाच्या स्वरूपात मिळणाऱ्या मरणाची चेतावणी देऊन पापाला (आणि त्याच्या दंडाला) मिटविण्याची पध्दत दाखविली, देणेकरी आहे. याप्रकारचे कर्ज फेडण्याचे एकमात्र पध्दत आपल्या जीवनात त्याच कार्याला पुन्हा सांगणे आहे. याचा अर्थ असा होतो की "कित्येकास अग्नीतून ओढून काढून त्यांचे तारण करा आणि देहाने 'डागाळलेली वस्त्रे' देखील द्वेष समजून भीतीयुक्त वृत्तीने कित्येकावर

दया करा'' (यहुदाचे पत्र २३).

होऊ शकते की आम्हामधून कोणाला सुवार्ता सांगत असता मरायची गरज पडणार नाही. आम्हामधून कोणाला सुवार्ता सांगताना तुरूंगवास होईल किंवा होणार नाही परंतु आमच्यापैकी प्रत्येकाला हरवलेल्याबद्दल तितकेच प्रेम असायला पाहिजे की आम्ही सांगू शकू की येशूमध्ये तारण आहे. हरवलेल्यापर्यंत तारण पोहचविण्याची तुम्ही किती इच्छा बाळगता?

• • •

**'जरी मी सुवार्ता सांगतो तरी मला प्रतिष्ठा मिरविण्याचे कारण नाही, ती सांगणे मला प्राप्त आहे. मी सुवार्ता सांगत नाही तर मला धिक्कार असो, दुर्बळास प्राप्त करून घेण्यासाठी मी दुर्बळास दुर्बळ झालो, मी सर्वांसाठी सर्व काही झालो आहे, यासाठी मी कसे तरी कित्येकांचे तारण साधावे'' (करिंथकरास पहिले पत्र ९:१६,२२).**

# जर "ख्रिस्ती लोक" ख्रिस्ती होतील

**- डब्ल्यू डग्लस हॅरिस**

**आ**मचे आधार वाक्य या गोष्टीला समोर आणायचे आहे की, सर्व जे ख्रिस्ती म्हटल्या जातात, पवित्र शास्त्राच्या अर्थाप्रमाणे ख्रिस्ती असतील तर ख्रिस्ती जगताची काही स्थिती कशी असेल.

१) कसलाही जातीय द्वेष राहणार नाही. येशू आणि त्याचे सर्व शिष्य यहुदी होते. येशूने म्हटले की, "......कारण यहुद्यातूनच तारण आहे" (योहान ४:२२). त्याचा अर्थ असा आहे की, तारण प्राचीन काळातील जातीमधून व्हायचा होता म्हणजे मनुष्याच्या सुटकेची ईश्वरीय योजना त्यांच्याद्वारे बनली आणि सांगितल्या गेली होती, ज्यामध्ये प्रतिज्ञा केलेली सुटका करणाऱ्याच्या रूपात येशूचे येणे होते.

येशू यहुदी आणि शोमरोनी याच्यामध्ये आढळणाऱ्या द्वेषाला समजत होता, कारण शोमरोनी लोक मिश्रित जातीचे होते; परंतु येशूने या गोष्टीची पर्वा न करता सुखार नामे नगरात एका शोमरोनी स्त्रीला प्यावयाला पाणी मागितले. येशूने त्या स्त्रीला परिवर्तित केले आणि शोमरोनी लोकांच्या त्यांच्यासोबत राहण्याच्या आमंत्रणाचा स्वीकार केला. द्वेषाच्या भिंतीला जी प्राचीन यहुदी आणि शोमरोनी यांच्यामध्ये होती ती भिंत पाडायाला आमच्या प्रभू येशूचे हे किती साहसाने भरलेले कार्य आहे.

जोपर्यंत परमेश्वराची गोष्ट आहे तोपर्यंत येशूच्या मृत्यूनंतर कोणतीच जातीय भिन्नता नाही (गलतीकरास पत्र ३:२६-२९).

२) ख्रिस्ती लोकांमध्ये युद्ध होणार नाही. ख्रिस्तीलोक संसारिक युद्ध करून आपले भांडणे मिटवीत नाहीत. ख्रिस्त जो ख्रिस्ती लोकांचा प्रमुख सेनापती आहे, त्याने कधीच कोणती सेना ठेवली नव्हती किंवा कोणतेच संसारिक युद्ध केले नाही.

जेव्हा ख्रिस्ती" म्हटल्या जाणारे सर्व लोक येशूला आपला राजा बनवितील तर त्यांच्यामधील लढाया संपतील.

३) नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टीकोनाने जगाची उलटापालट होईल. आपले शिक्षण आणि व्यवहाराद्वारे आरंभीच्या ख्रिस्ती लोकांनी असेच केले होते (प्रेषितांची कृत्ये १७:६) आम्हाला त्यांच्यासारखेच ख्रिस्त आणि त्याच्या कार्यासाठी मनात आग असण्याची आवश्यकता आहे. वाईट वाटते की, पुष्कळश्या ख्रिस्ती म्हणविल्या जाणाऱ्या लोकांचे प्रेम आणि उत्साह थंडा झालेला आहे.

जर ख्रिस्ती लोक पवित्रशास्त्राच्या अर्थाने ख्रिस्ती होतील तर पहिल्या शतकातील ख्रिस्तीपण परत येईल, ज्यामध्ये धार्मिक कार्यामध्ये फक्त पवित्रशास्त्रच मार्गदर्शक होईल, आणि नवीन कराराची मंडळी एकमात्र धार्मिक समुदाय होईल. येशूचा खरा आत्मा परत येईल, ज्यामध्ये मनुष्य जातीसाठी प्रेम आणि हरवलेल्यांच्या तारणासाठी त्याची इच्छा होईल. ख्रिस्ती लोकांचा उद्देश असेल.

• • •

**जोपर्यंत परमेश्वराची गोष्ट आहे तोपर्यंत येशूच्या मृत्यूनंतर कोणतीच जातीय भिन्नता नाही (गलतीकरास पत्र ३:२६-२९).**

# जर मातीला बोलता आले असते

**- ओवन कोस्ग्रोव**

**प्र**भूचे बी पेरणाऱ्याचा दाखल्याला जमिनीचा दाखला पण म्हटले आहे (लूक ८:१०पासून). ही जमीन चार प्रकारच्या मानवीय मनाला दर्शविते.

**रस्त्याच्या किनाऱ्यावरील मन :**

आपल्या प्रामाणिक क्षणामध्ये, हे मन परमेश्वर आणि त्याच्या इच्छेच्या प्रति हैराण करणारी उदासिनता प्रकट करते. घमंड, संदेह आणि उदासीनद्वारे सैतान सुवार्तेच्या बीजाला गिळून टाकतो. रस्त्याच्या किनाऱ्याचे मन परमेश्वर आणि त्याच्या वचनाला सोडून बाकी सर्व गोष्टी करते. आध्यात्मिक अर्थ याचा काढला तर या मनात परमेश्वराला काही जागा नाही आणि या कारणाने याच्यासाठी स्वर्गामध्ये काही स्थान नसणार.

**खडकाळ जमीनीवर असलेले मन :**

या मनात वचन ऐकून ते वचन आनंदाने ग्रहण करितात, पण थोडासा छळ किंवा परेशानी त्याला खुंटून टाकीते काही वेळेपर्यंत विश्वास धरते, पण परीक्षेच्या वेळी गळून पडतात (लूक ८:१३). या मनात आध्यात्मिकता खोलवर नाही. हे मन अस्थिर आणि चंचल आहे. या मनात वचनाचा वास्तविक अर्थ आणि मूळ मिळत नाही म्हणून हे सुकून जाते.

**झुडपांनी घेरलेल्या जमिनीचे मन :**

हे मन आपले प्रत्येक प्रकारचे कार्यक्रम, कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि नोकरीच्या गोष्टी सांगेल. या मनात पहिल्यापासून धन संसाराच्या चिंता, भरलेल्या आहेत. त्यमुळे ते पक्क फळ देत नाही (लूक ८:१४). हे

मन म्हणते की, "कृपा करून कोण्या दुसऱ्याकडे जा. मी फार व्यस्त आहे. मला वेळ नाही."


**चांगले आणि प्रामाणिक जमिनीचे मन :**

हे मन संसाराचा सर्वात सुंदर धडा शिकविते आणि सांगते की, "तर प्रथम तुम्ही त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवायची खटपट करा, म्हणजे याबरोबर सर्व गोष्टी तुम्हास मिळतील (मत्तय ६:३३). काय संदेश आहे ! काय घोषणा आहे ! कदाचित आमचे मन हा समर्पित विषय सांगेल आणि धीराने फळ देईल(लूक ८:१५).

आमचे मन गोष्टी करतात. जीवनाचा आमचा संदेश परमेश्वर आणि मनुष्यासमोर दाखविला जातो. कदाचित आमची मने ती जमीन बनावी ज्यामधून परमेश्वराच्या महिमाचे पुष्कळसे आत्मिक फळ मिळतात. " हे परमेश्वरा माझ्या दुर्गा, माझ्या उद्धारका, माझ्या तोडचे शब्द व माझ्या मनचे विचार तुला मान्य असो" (स्तोत्रसहिता १९:१४).

• • •

> हे मन संसाराचा सर्वात सुंदर धडा शिकविते आणि सांगते की, "तर प्रथम तुम्ही त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवायची खटपट करा, म्हणजे याबरोबर सर्व गोष्टी तुम्हास मिळतील
>
> (मत्तय ६:३३).



# खोटी साक्ष देणे

**- जॉन गिप्सन**

'**को**णाच्याही विरुद्ध खोटी साक्ष देऊ नको'' (निर्गम २०:१६). हे शब्द दहा आज्ञेमधून घेतल्या गेले आहेत आणि आम्ही सर्व याला समजतो. चारित्र्य हनणाची मनाई आहे.

परमेश्वराने आज्ञा दिली ''कोणी काही अधर्म किंवा पापकर्म केले तर त्याने केलेल्या त्या पापासंबंधाने त्याच्या विरुद्ध कोणी एकटाच साक्षीदार उठला तर चालणार नाही. दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या साक्षीने कोणत्याही प्रकरणाचा निर्णय करावा'' (अनुवाद १९:१५).

या संरक्षणाशिवाय साक्षीदारासाठी आपण स्वत:ला खोटे बोलण्यासोबत बांधून निर्दोशांचा नाश करणे संभव आहे. नाबोत आणि येशू ख्रिस्ताबरोबर असेच झाले होते. कठोर मन असलेल्या साक्षीदाराच्या साक्षीने दोघांना मृत्यूदंड मिळाला.

खोट्या साक्षीने होणारी पिडा, जखम, प्रतिष्ठेची हानी आणि मृत्यूचा केवळ अनुमानच लावू शकतो. मोशेच्या नियमशास्त्राच्या अधीन अशा फसविणाऱ्या दोषी असलेल्यांना माहीत होते की, "जीवाबद्दल जीव डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय द्यावाच लागेल. लोकांना आज्ञा होती" "आपल्या बांधवाविरुद्ध खोटी साक्ष दिली आहे असे आढळून आले तर आपल्या बांधवाची जी हानी करण्याचे त्याने योजिले असेल तीच हानी त्याची करावी; या रितीने तू आपल्यातील दुष्टाई काढून टाकावी. इतर लोक हे ऐकून दहशत पावतील आणि पुढे तुझ्यामध्ये असले दुष्कर्म करणार नाहीत" (अनुवाद १९:१६-२१).

बर्टन कॉफमेनच्या शब्दामध्ये लोक जे खोटं बोलतात होऊ शकते की ते पकडल्या जाणार नाही, होऊ शकते की खोटी बदनामी करणारा आपले ध्येय प्राप्त करेल. परंतु परमेश्वराचा क्रोध अशा दुष्टतेविरुद्ध प्रगट होतो. नीच मन जे धूर्त-कपटी जीभेने मानवीय भावाच्या प्रतिष्ठेची हत्या करते ते शेवटपर्यंत वाचणार नाही. परमेश्वर दोषीला दंड देईल.

• • •

परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक व सर्व लबाड यास अग्नीच्या व गंधकाच्या जळत्या सरोवरात वाटा मिळेल हे दुसरे मरण आहे (प्रकटीकरण २१:८)

# ख्रिस्ताच्या मंडळीला नाव देण्यासाठी शब्द

**- बिल निक्स**

**न**वीन करारामध्ये सतत उपयोगात येणारा शब्द केवळ ''मंडळी'' आहे. यामध्ये प्रत्येक वेळेस त्या मंडळीची गोष्ट होत नाही, ज्या मंडळीला ख्रिस्ताने बनविले. प्रेषितांची कृत्ये १९:३२ मध्ये याचा अर्थ एक क्रोधीत गर्दी असा आहे. प्रेषितांची कृत्ये ७:३८ मध्ये याचा अर्थ जंगलामध्ये इस्त्राएली लोक आहे.

''मंडळीचा'' किंवा चर्चचा अर्थ तारलेल्या लोकांचा समूह'' आहे विटा दगडाची इमारत नव्हे मंडळीसंबंधी आपल्या स्वत:मध्ये याचा अर्थ ते लोक आहेत ''ज्यांना अंधारातून प्रकाशामध्ये बोलाविण्यात आले आहे (१ पेत्र २:९) अंधाराच्या सत्तेतून निघून त्याच्या प्रिय पुत्राच्या राज्यात येणे आवश्यक आहे (कलस्सै १:१३). ''त्या उपदेशाला मानणे ही आवश्यक आहे (रोमकरास पत्र ६:१७ पासून). नंतर परमेश्वराच्या आज्ञापालनाने ख्रिस्ताद्वारे मंडळीमध्ये मिळविणे आवश्यक आहे. (प्रेषितांची कृत्ये २:३८-४७). हा विश्वासही करणे आवश्यक आहे की पापांची क्षमा झाली आहे. यासाठी की आम्हाला प्रत्येक दिवसाच्या जीवन तसेच मंडळीच्या उपासना, सभेमध्ये सेवा आणि परमेश्वराची आराधना करण्यासाठी स्वत:ला समर्पित करणे आवश्यक आहे.

आम्ही स्वत:ला मंडळीपासून वेगळे करू शकत नाही, कारण ख्रिस्त तिचे मस्तक आहे (कलस्सैकरास १:१८).आम्ही मंडळीबरोबर जे काही करायचे किंवा न करण्याचा निर्णय घेतो तेच आम्ही ख्रिस्ताबरोबर करणे किंवा न करण्याची निवड करतो (मत्तय २५ :४-४५, प्रेषितांची कृत्ये ९:१-५).

मंडळीला ख्रिस्ताद्वारे ''माझी मंडळी'' (मत्तय १६:१८) आणि पौलाद्वारे ''ख्रिस्ताच्या मंडळ्या'' (रोमकरास पत्र १६:१६) या शब्दांद्वारे

स्वामीत्वाची माहिती होते.

मंडळीला ''देवाचे घर अथवा कुटुंब'' ही म्हटले आहे. (तिमथ्याला पहिले पत्र ३:१५; इफिकरास पत्र २:१९, ३:१५) याचा अर्थ असा आहे परमेश्वर आमचा पिता आहे आणि आपण त्याची संतान आहोत आणि परिवारात बंधुप्रितीने भाऊ आणि बहिणी आहोत (करिंथकरास ६:१८, गलतीकरास पत्र २:२६; रोमकरास पत्र १२:९, पेत्राचे दुसरे पत्र १:५-७).

मंडळीला ''ख्रिस्ताचे शरीर'' ही म्हटल्या गेले आहे (कलस्सैकरास पत्र १:१८; २४; इफिसकरास पत्र १:१०-२३). ज्यामध्ये ख्रिस्ताचे मस्तक होणे; सभासदांचे ख्रिस्तामध्ये अधीन होणे आणि सभासदानी पूर्णरितीने ख्रिस्ताच्या आज्ञा पाळून काम करण्यावर जोर दिला गेला आहे (करिंथकरास पहिले पत्र १२:१२-३१). जर एका अवयवाला शरीरापासून वेगळे केले तर ते चांगल्याप्रकारे कार्य करू शकत नाही. हे आवश्यक आहे की, जे लोक प्रभूच्या शरीराच्या भागाच्या रूपामध्ये ख्रिस्ताच्या नावाला परिधान करतात ते त्याला प्रभूच्या रूपात सन्मान देवो.

• • •

''मंडळीचा'' किंवा चर्चचा अर्थ तारलेल्या लोकांचा समूह'' आहे विटा दगडाची इमारत नव्हे मंडळीसंबंधी आपल्या स्वत:मध्ये याचा अर्थ ते लोक आहेत ''ज्यांना अंधारातून प्रकाशामध्ये बोलाविण्यात आले आहे.

(१ पेत्र २:९)



# परमेश्वराने मंडळीला संगठीत केले

**- गॅरी सी. हेम्पन**

**पि**त्याने ख्रिस्ताला मंडळीचे मस्तक बनविले (इफिसकरास पत्र १:२०-२३). येशूला स्वर्ग आणि पृथ्वीचा सर्व अधिकार दिल्या गेला आहे (मत्तय २०:२८). आम्हाला त्याच्या अधिकाराला मानायची आवश्यकता आहे.

आमचा प्रभू तारण पावलेल्यांना मंडळीत मिळवितो (प्रेषितांची कृत्ये २:४७). मंडळीचा सभासद मनुष्याने निवडून दिल्याने होत नाही. मंडळीचे सभासदत्व जगभरातील सर्व लोकांसाठी खुले आहे (मार्क १६:११५,१६, रोमकरास पत्र १:१६). नवा करार मंडळीच्या विश्वव्यापी संगठनाची नव्हे तर मंडळीच्या स्थानिक संगठनाची गोष्ट सांगत आहे. असे वाटते की येशूच्या अधिन प्रेषित लोक यरूशलेम आणि यहुदियाच्या मंडळीवर होते (प्रेषितांची कृत्ये ६:१-४). थोड्या वेळाने वडिलांचा उल्लेख आढळतो (प्रेषितांची कृत्ये ११:२७-३०). आपल्या पहिल्या मिशनरी यात्रेच्या शेवटी पौल आणि बर्णबाने ''प्रत्येक मंडळीत'' प्राचीन म्हणजे वडील

नेमले. पौलाने तीताला क्रेतात नगरा-नगरात प्राचीन वडिलांना नियुक्त करण्याचे निर्देश दिले (प्रेषितांची कृत्ये १४:२३, तीताला पत्र १:५). त्याने अशा पदासाठी लोकांनी नेमण्याच्या आधी वडिलांची योग्यता दाखविली (वचन ६-९, तिमथ्याला पहिले पत्र ३:१-७).

हे वडिलांचे काम आहे की त्या कळपाची देखरेख करणे की, ज्यांच्यामध्ये ते काम करतात (प्रेषितांची कृत्ये २०:२८). पेत्राने त्यांना आठवण करून दिली की येशू मुख्य मेंढपाळ आहे (पेत्राचे पहिले पत्र ५:१-४). याशिवाय सभासदांनी लक्ष दिले पाहिजे की, वडिलांचे काम त्यांच्या प्राणांच्या रक्षणासाठी जागरूक राहणे आहे की ज्यांचा त्यांना हिशोब द्यायचा आहे. जे त्यांच्या पुढारीपणावर सावधानीपूर्वक विचाराला प्रोत्साहीत करेल. (इब्रीलोकस पत्र १३:१७).

मंडळीतील सेवकाबद्दल इतके काही सांगण्यात आले नाही, परंतु आम्ही काही महत्त्वपूर्ण तथ्याला एकत्र करू शकतो. तिमथ्याला पहिले पत्र ३:८-१३. मध्ये पौलाने सेवकाबद्दल काही योग्यता दाखविली आहे. या पदावर काम करणारे सर्वात पहिले सात लोक होते की ज्यांना प्रेषितांच्या निर्देशाने नियुक्त केले गेले होते (प्रेषितांची कृत्ये ६:१-८). लक्ष द्या की त्यांना एक विशेष कार्य सोपविल्या गेले होते आणि जेव्हा हे कार्य पूर्ण झाले तेव्हा परमेश्वराचे वचन वाढले आणि मंडळीने उन्नती केली.

नवीन करार सुवार्ता सांगणाऱ्याविषयी ही बोलतो. त्यांचे कर्तव्य, वचन सांगणे होते, कळपाला चारणे किंवा त्याची देखरेख करणे नव्हे (तिमथ्याला दुसरे पत्र ४:१-५). त्यांनी येशूचा प्रचार करणे आणि परमेश्वराच्या निर्देशनाची प्रत्येक गोष्ट सांगितली पाहिजे (करिंथकरास २:१-२, प्रेषितांची कृत्येक ४:१२; २०:२५-२७).

• • •

# विश्वासूपणा

**- मॅक्सी बी. डोरेन**

**य**हुदाने ख्रिस्ती लोकांना "त्या विश्वासासाठी पूर्ण यत्न" करायचा आग्रह केला की "जो पवित्र लोकांना एकदाच सोपविला गेला होता" (यहुदाचे पत्र ३). तो लोकांच्या व्यक्तीगत विश्वासाची गोष्ट करत नव्हता परंतु धर्माच्या त्या व्यवस्थेची गोष्ट करीत होता जे येशूने दिले होते. नव्या करारामध्ये "विश्वासाला" मार्गामध्ये मिळविल्या गेले आहे. आता जेव्हा पवित्र शास्त्र स्पष्ट रूपात सांगते की मार्ग केवळ एक आहे, तेव्हा कोणताच तर्क वितर्क निष्कर्ष राहत नाही की विश्वास केवळ एक आहे. जसे येशूने म्हटले, मार्ग मीच आहे." (योहान १४:६). पौलाने म्हटले की, एक विश्वासू, (इफिसकरास पत्र ४:५).

यासाठी लोक जेव्हा अनेक विश्वासाबद्दल गोष्टी करतात तेव्हा ते चुकीचे होतात. हा भ्रमित विचार साधारणत: लोकांच्या चर्चेमध्ये आढळतो. कदाचित कोणी एखाद्याला विचारतो "तुमचा विश्वास काय आहे? वास्तविक त्याचा म्हणण्याचा अर्थ असतो की तुम्ही कोणत्या मंडळीचे आहात? किंवा तुमची मंडळी कोणती?" अशा शब्दांचा उपयोग यासाठी केला जातो की पुष्कळसे लोक हे मानू लागले आहे की मंडळ्या पुष्कळ आहेत (आणि या कारणाने विश्वासही पुष्कळसे आहेत) आणि एक मंडळी दुसऱ्या मंडळीसारखी खरी आहे आणि यामुळे काही फरक पडत नाही की कोणी कोणत्या मंडळीचा आहे.

पवित्रशास्त्र स्पष्टपणे दाखवते की "एकच शरीर आहे" आणि त्या एकच शरीराला मंडळी म्हणतात (कलस्सैकरास पत्र १:१८ आणि इफिसकरास पत्र ४:४).

हे तथ्य आहे की आज पुष्कळ कथित "मंडळ्या" पाहायला मिळतात या सत्याला बदलू शकत नाही की येशू ख्रिस्ताने एकच मंडळी

तयार केली. येशूने म्हटले "आणखी मी तुला सांगतो की तू पेत्र आहेत आणि या खडकावर मी माझी मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्याद्वारेच काहीच चालणार नाही" (मत्तय १६:१८). यासाठी की त्याने तिला आपल्या रक्ताने मिळविली (प्रेषितांची कृत्ये २०:२८, इफिसकरास पत्र ५:२५). ही त्याची मंडळी आहे आणि परमेश्वराने त्याला तिचे मस्तक होण्यासाठी दिली आहे (इफिसकरास पत्र १:२०-२३).

जेव्हा कोणी येशूची सुवार्ता ऐकतो, त्यावर विश्वास ठेवितो, त्याची गोष्ट मानतो, (पश्चात्ताप करून, परमेश्वराच्या पुत्राच्या रूपात येशू ख्रिस्तामध्ये आपल्या विश्वासाची कबुली देतो आणि बाप्तिस्मा घेऊन) तर तो येशू ख्रिस्ताच्या शरीरामध्ये येतो. या प्रकारे तो ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद बनतो. त्या मंडळीत असण्याचा अर्थ त्या मार्गात जाणे आहे...विश्वासाला ठेवणे आहे...परमेश्वराचे लेकरे बनणे आणि स्वर्गीय राज्याचे लोक होणे आहे.

• • •

"आणखी मी तुला सांगतो की तू पेत्र आहेत आणि या खडकावर मी माझी मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्याद्वारेच काहीच चालणार नाही" (मत्तय १६:१८)

# एकमेकांचे हाथ पकडणे

**- जो मेलोन**

"त्या समयी असे झाले की मोशे आपले हात वर करी तेव्हा इस्त्राएलाची सरशी होई व तो आपले हात खाली करी तेव्हा अमालेकांची सरशी होई. मोशाचे हात भरून आले तेव्हा त्यांनी एक धोंडा घेऊन मोशाच्या खाली ठेविला व तो त्यावर बसला आणि अहरोन व हूर यांनी दोहो बाजूकडून त्याच्या हातास टेका दिला; म्हणून सूर्य मावळेपर्यंत त्याचे हात स्थिर राहिले" (निर्गम १७:११-१२).

त्या युद्धामध्ये अहरोन आणि हूरद्वारा मोशेच हात पकडण्यासाठी दिल्या गेलेली सहायता प्रभूच्या सेनेमध्ये आम्हा सर्वांसाठी प्रेरणा असायला पाहिजे.

काय एक दुसऱ्याच्या प्रेमाच्या परिश्रमात निस्वार्थ प्रशंसा केल्यावर आम्हाला सर्वांना अतिरिक्त सामर्थ्य मिळत नाही? आणि याप्रकारे आम्ही एक दुसऱ्यांचे हात पकडत नाही?

ह्या जगामध्ये सर्वात मोठ्या कामात आमची रूची म्हणजे ख्रिस्ताच्या मंडळीचे काम निश्चित रूपाने आम्हा सर्वांना स्वार्थ, तक्रार करणे, मत्सर, एकीकडे ठेवण्यासाठी प्रेरित करितो, जे वाईट वाटणे, चुगली करणे, सर्वांवर  प्रेम करणे आणि कोणाचा द्वेष न करण्याच्या कारणाने येतात; त्या विजयी युद्धात एकमेकांचा हाथ धरणे. सर्व शक्तीमान परमेश्वर आणि आमचा प्रभू येशू ख्रिस्ताच्या महिमेसाठी काम करणे आहे. एकमेकांची ओझे वाहा, म्हणजे तुम्ही ख्रिस्ताचा नियम पूर्ण कराल" (गलतीकरास पत्र ६:२).

प्रभूच्या सेनेचे थकलेले कित्येक शिपाई ज्यांचे हात आणि अंत:करण जड होते, विश्वासाची चांगल्या कुस्ती लढत राहून अंतिम आणि विजयी

जीवन प्राप्त करायला पुढे चालत गेले. कारण विश्वासाच्या त्यांच्या शिपायांनी आपल्या विनम्र आणि चांगल्या प्रयत्नामध्ये त्यांच्या सहकार्याला निस्वार्थी रूपात धरून ठेवले आहे.

दुसरीकडे सत्यता आणि धार्मिकतेच्या सेनेचे इतक्या थकलेल्या शिपायांनी, जड हाताने आणि अंत:करणाने घोर निराशेच्या खाईमध्ये जीवनाच्या सर्वात मोठ्या लढाईमध्ये हार पत्करली, कारण लढाईमध्ये त्यांचे आपलेच सोबती''मनुष्यांबरोबर मनुष्याच्या अमानवियतेचे दोषी बनले.''

अहरोन व्हा! हूर व्हा! विश्वासात आपल्या बहिणभावाची मदत करा. एकमेकांची ओझी वाहा.

''मनुष्याचे मन चिंतेने दबून जाते, परंतु गोड शब्द त्याला आनंदित करितो'' (नीतिसूत्रे १२:२५).

• • •

''त्या समयी असे झाले की मोशे आपले हात वर करी तेव्हा इस्राएलाची सरशी होई व तो आपले हात खाली करी तेव्हा अमालेकांची सरशी होई. मोशाचे हात भरून आले तेव्हा त्यांनी एक धोंडा घेऊन मोशाच्या खाली ठेविला व तो त्यावर बसला आणि अहरोन व हूर यांनी दोहो बाजूकडून त्याच्या हातास टेका दिला; म्हणून सूर्य मावळेपर्यंत त्याचे हात स्थिर राहिले''

निर्गम १७:११-१२)

# प्रोत्साहन

**- होर्वे पोटर**

**मा**झ्या विचारात पवित्र शास्त्राचे पुष्कळसे विद्यार्थी मानतील की, पौल आजपर्यंतच्या सर्वात स्थिर ख्रिस्ती लोकांमधून एक होता. परमेश्वराच्या पुत्राच्या रूपामध्ये येशूचे सत्य माहिती झाल्यावर त्याने "मनाने आज्ञा मानली". त्याने त्याच्या जीवनाच्या जुन्या मार्गाकडे वळून कधीच पाहिले नाही. तो ख्रिस्ताची एक नवीन सृष्टी झाला होता. त्याने येशूसाठी सर्व काही सोडले होते.

आम्हाला आश्चर्य होऊ शकते की इतका मजबूत असूनही तो कधी निराश होऊ शकेल; परंतु आम्हाला समजते की, तो निराश झाला. आम्ही सर्व पुष्कळदा निराश होतो. येथपर्यंत की आपल्या शिष्यांच्या मनाच्या कठोरतेमुळे आणि अविश्वासाच्या कारणाने पुष्कळदा येशू पण निराश झाला. हीच गोष्ट आजपण आहे. तो आमच्या अविश्वासामुळे निराश होतो.

प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात शेवटच्या वचनामध्ये "लूक ने हे मार्मिक शब्द टाकले आहेत" "तेथले बंधुजन आम्हाविषयी ऐकून अप्पियाची पेठ व तीन उतार शाळा एथपर्यंत आम्हास सामोरे आले. त्यास पाहून पौलाने देवचे उपकार स्मरण केले आणि त्याला धैर्य आले" (प्रेषितांची कृत्ये २८:१५).

हा एक लांब आणि कठीण प्रवास होता. पौल ऑक्टोबरच्या शेवटी कैसरियामधून गेला होता आणि रोमच्या भूमीवर त्याच्या पोहचण्याच्या समयी  वसंत ऋतू होता. त्याने समुद्राच्या विनाशकारी वादळामध्ये दोन आठवडे घालविले होते. माल्टाच्या तटावर त्याचे जहाज तुटले होते आणि शेवटी थंडी संपल्यावर ते रोमला जायला निघाले होते.

तो जगातील सर्वात मोठे शहर रोममध्ये पहिले कधी गेला नव्हता. तो तेथे जाण्यासाठी फार दिवसापासून उत्सुक होता. परंतु त्याची इच्छा होती की तेथील मंडळीला भेट द्यावी. हे सर्व होण्यापूर्वी तीन वर्षापासून तो त्याची योजना बनवत होता. तो रोमी सरकारचा बंदी होता कारण त्याच्या देशवासियांनी त्याच्यावर खोटे आरोप लावले होते. त्याला माहीत नव्हते की, कोण्या ख्रिस्ती लोकांना माहीत असेल की तो तुरूंगावास आणि फिर्यादिसाठी तेथे जात आहे.

रोमच्या ख्रिस्ती लोकांनी ऐकले होते की पौल रोममध्ये येत आहे. वास्तविक त्यामधून काही लोक अप्पियाच्या पेठ व तीन उतारशाळेपर्यंत बेचाळीस मैल (६७ किलोमीटर) पर्यंत सामोरे गेले होते. पौलासाठी हे अनपेक्षित आश्चर्य होते. यात काही आश्चर्याची गोष्ट नाही की या "लोकांना पाहून प्रभूला धन्यवाद दिला आणि त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळाले." त्याला (पौलाला) त्यांच्या येण्याकडून एक ताजेपणा मिळाला. त्याने त्यांच्यासाठी प्रभूला धन्यवाद दिला. त्यांचे मंडळीबद्दल आणि प्रभू येशू ख्रिस्तासाठी तोच विश्वास आणि प्रेम होते. जेव्हा आपण "एकच बहुमूल्य विश्वास" असलेल्या लोकांना भेटतो तर त्यांच्याकडून आम्हाला सामर्थ्यच मिळते. वास्तविक लूक ने पौलाच्या यरूशलेमातील, तुरूंगावसामधील आपल्या विवरणामध्ये "धैर्य" शब्दाचा उपयोग केला आहे. मग त्याने महासभेसमोर पौलाच्या फिर्यादिच्या समयी "मोठी गडबड"ची गोष्ट लिहिली. असा त्यांचा मोठा कलह चालला असता ते पौलाला फाडून टाकतील असे भय वाटून सरदारने शिपायांना हुकूम केला की खाली जाऊन त्याला त्याजकडून सोडून गढीत आणावे" (प्रेषितांची कृत्ये २३:१०) आणि मग अकरावे वचन दाखवते की "त्याच रात्री प्रभू त्याजपुढे उभा राहून म्हणाला धीर धर; जशी तू यरूशलेमात

मजविषयी साक्ष दिली तशी रोम येथेही तुला द्यावी लागेल."

आम्हाला सर्वात मोठे सामर्थ्य आणि प्रोत्साहन प्रभूकडून मिळते. त्यानंतर पौलाने फिलिप्पै येथील ख्रिस्ती लोकांना लिहिले की, "मला सामर्थ्य देणाऱ्याच्या ठायी मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे" (फिलिप्पकैकरास पत्र ४:१३). ही गोष्ट प्रत्येक ख्रिस्ती लोकांसाठी लागू होते. येशू सर्वदा तेथेच असतो आणि त्याला माहिती असते की, आम्हाला केव्हा आणि कशी आणि किती मदतीची आवश्यकता आहे. जे सामर्थ्य येशू देतो ते दैवी सामर्थ्य आहे. ते सामर्थ्य पृथ्वी देऊ शकत नाही. ते सामर्थ्य गोळ्यांमध्ये, दारूमध्ये मानवीय दर्शन शास्त्रात, सेक्समध्ये किंवा शारीरिक तृप्तीमध्ये नाही. असे स्वर्गीय प्रोत्साहन जीव, मन आणि हृदयासाठी आवश्यक आहे. याने आमच्या जीवनात स्थिरपणा येतो. ग्रीक शब्दाचा मूळ अर्थ "दृढ होणे, उदार होणे" आहे. जीवन याच प्रकारे जगण्यासाठी होते.

ख्रिस्ती व्यक्तींना सर्वात अधिक प्रोत्साहन प्रभूकडून आणि सोबतच्या ख्रिस्ती लोकांकडून मिळते. जगाजवळ या बाबतीत देण्यासाठी काही नाही, जग केवळ क्षणिक गोष्टी देण्याच्या गोष्टी करते. जेव्हा जीवाला याहीपेक्षा कितीतरी अधिकतेची आवश्यकता आहे. प्रभू आणि लोकांकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनाची वाट पहा.

• • •

**"तेथले बंधुजन आम्हाविषयी ऐकून अप्पियाची पेठ व तीन उतार शाळा एथपर्यंत आम्हास सामोरे आले. त्यास पाहून पौलाने देवचे उपकार स्मरण केले आणि त्याला धैर्य आले" (प्रेषितांची कृत्ये २८:१५)**

# ठाम भूमिका घेणे

**- टॉम केल्टन**

परमेश्वर आमच्याकडून सर्वांसमोर घोषणा करायला सांगतो की आम्ही सांगावे की आम्ही कोणाकडे आहोत.

आमचे पहिले माता-पिता (आदाम हवा) पासून आरंभ करून विकल्प आम्हाला स्पष्ट सांगितले आहे की, एक तर आज्ञा पाळा किंवा तोडा किंवा जीवन घ्या किंवा मृत्यू, इमानदारी करा किंवा बेईमानी करा; निवड तुमची आहे. तुम्हाला यामधून एकाला निवडायचे आहे.

"तेव्हा परमेश्वर देवाने अशी आज्ञा दिली की बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ येथेच्छ खा; पण बरे वाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको. कारण ज्या दिवशी तू त्याचे फळ खाशील त्या दिवशी तू खास मरशील" (आदाम आणि हवाला परमेश्वर,उत्पत्ती २:१६,१७).

"आकाश आणि पृथ्वी यास साक्षी ठेवून आज मी तुम्हास सांगतो की, जीवन आणि मरण, आशीर्वाद आणि शाप ही तुजपुढे ठेविली आहेत; तू जीवन निवडून घे म्हणजे तू व तुझा वंश जिवंत राहील. आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर त्याची वाणी ऐक व त्यास धरून राहा. कारण त्यातच तुझे जीवन आहे, त्यातच तुझी आयुवृद्धी आहे. असे केल्याने जो देश देण्याविषयी परमेश्वराने तुझे पूर्वज अब्राहाम इसहाक व याकोब यांची आणभाक केली त्यात तुझी वस्ती होईल" (इस्त्राएलींना मोशे, अनुवाद ३०:१९,२०).

"परमेश्वराची सेवा करणे हे तुम्हास गैर दिसत असले तर तुम्ही कोणाची सेवा करणार हे आज ठरवा; महानदीपलीकडे तुमच्या पूर्वजांनी जे देव पुजिले त्यांची किंवा तुम्ही राहत आहा त्या देशातल्या अमोऱ्याच्या देवांची? मी आणि माझे घराणे तर परमेश्वराची सेवा करणार"

(इस्त्राऐलींना, यहोशवा २४:१५).

"तुम्ही दोहोमध्ये कोठवर लटपटाल ? परमेश्वर हा देव असला तर त्याच्या भजनी लागा बाल हा देव असला तर त्याच्या भजनी लागा. लोकांनी त्यास एका शब्दानेही उत्तर दिले नाही"(कर्मेल पर्वतावर ऐलीया पहिले राजे १८:२१).

"कोणाच्याने दोन धन्याची चाकरी करवत नाही, कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीति करील, किंवा एकाशी निष्ठेने वागेल व दुसऱ्याला तुच्छ मानील, तुमच्याने देवाची आणि धनाचीही सेवा करवत नाही" (पर्वतावरील प्रवचनामध्ये येशू, मत्तय ६:२४).

"येशूने त्याला म्हटले, जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागे पाहतो तो देवाच्या राज्यास उपयोगी नाही" (येशू एका भावी शिष्याला,लूक ९:६२). "पण तू तसा नाहीस, कोमट आहेस, म्हणजे उष्ण नाहीस, शीत नाहीस म्हणून मी तुला आपल्या तोंडातून ओकून टाकीन" (पवित आत्मा मंडळ्यांना, प्रकटीकरण ३:१६). उत्पत्तीपासून प्रकटीकरणापर्यंत एकच आव्हान आहे. आपली बाजू निवडा! समर्पित व्हा! घोषणा करा! ठाम भूमिका घ्या!

**ठाम भूमिका घेण्याचे कारण :**

१) प्रामाणिकपणा आम्हाला घोषणा करण्यासाठी आवरून धरिते. येशू खरा होता. कोणताही मनुष्य एकाच वेळेस दोन धन्याची चाकरी करू शकत नाही.

२) आज्ञापालन आम्हाला घोषणा करण्यास आवरून धरिते. मनुष्य येशूच्या शिक्षणाला मनापासून मानतो आणि बाप्तिस्मा घेतल्यावर पापापासून स्वतंत्र केल्या जाते. आम्ही आमच्या उरलेल्या जीवनात ख्रिस्ताबरोबर उभे राहण्याची शपथ घेतो. असे करायला त्या आमच्या विश्वासात संतुष्ट होणे आवश्यक आहे. जो पवित्र लोकांना एकदाच आणि सदा सर्वदासाठी सोपविला गेला आहे.

३) प्रेम आम्हाला घोषणा करायला आवरून धरिते "कारण ख्रिस्ताची प्रीति आम्हास आवरून धरिते" (दुसरे करिंथकरास पत्र ५:१४).

आम्हाला सुवार्तेला वाचविण्यासाठी आपण स्वत:ला देणे आवश्यक आहे. प्रेम केल्याशिवाय आपल्या स्वत:ला दिल्या जाऊ शकते, परंतु आपल्या स्वत:ला दिल्याशिवाय प्रेम केल्या जावू शकत नाही. परमेश्वराने इतके प्रेम केले की त्याने दिले. त्याबदल्यात जर आपण खरोखर त्याच्यावर प्रेम करतो तर आपणही देऊ शकतो. आपल्या जीवनाला, आपले समर्पण,आपले धन, आपला वेळ,आपले सर्व काही.

जेव्हा आपण असे करतो तर आम्हाला, जगाला आणि परमेश्वराला माहीत होते की आम्ही कोणाकडे कोठे आहोत.

**पौलाच्या लेखामध्ये आढळणारा आत्मविश्वास :**

" मी सर्व काही करावयास शक्तिमान आहे" (फिलिप्पेकरास ४:१३).

"मला सुवार्तेची लाज वाटत नाही, कारण... देवाचे सामर्थ्य अशी आहेत (रोमकरास पत्र १:१६).

"ज्याने मला शक्ती दिली त्या आपल्या प्रभू ख्रिस्त येशूचे मी आभार मानितो..." (तिमथ्याला पहिले पत्र १:१२).

"......मी सुवार्तेसंबंधी प्रत्युत्तर देण्यास नेमलेला आहे ..." (फिलिप्पैकरास पत्र १:१६).

"जे सुयुद्ध ते मी केले आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे" (तिमथ्याला दुसरे पत्र ४:७).

"मी आजपर्यंत देवाबरोबर पूर्ण सद्‍भावेकरून प्रजाधर्माने वर्तलो" (प्रेषितांची कृत्ये २३:१).

"याप्रमाणे तुम्हासही सुवार्ता सांगण्याची माझ्या ठायी उत्सुकता आहे"(रोमकरास पत्र १:१५).

"........ मी लाजत नाही, कारण मी कोणावर विश्वास ठेविला आहे हे मला ठाऊक आहे आणि तो माझी ठेव त्या दिवसासाठी राखावयास

शक्तीमान आहे असा माझा भरवसा आहे'' (तिमथ्याला दुसरे पत्र १:१२).

''कारण आता माझे अर्पण होत आहे आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे'' (तिमथ्याला दुसरे पत्र ४:६).

''कारण देवाने आपल्याला भित्रेपणाचा नव्हे तर सामर्थ्याचा, प्रीतिचा व अनुशासनाचा आत्मा दिला आहे'' (तिमथ्याला दुसरे पत्र १:७).

• • •

''तेव्हा परमेश्वर देवाने अशी आज्ञा दिली की बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ येथेच्छ खा; पण बरे वाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको. कारण ज्या दिवशी तू त्याचे फळ खाशील त्या दिवशी तू खास मरशील'' (आदाम आणि हवाला परमेश्वर,उत्पत्ती २:१६,१७).

# लेकरांना शिकवणे

**- जो रोऊ**

"मुलाच्या स्थितीस अनुरूप असे शिक्षण त्याला दे, म्हणजे वृद्धपणीही तो त्यापासून परावृत्त होणार नाही" (नीतिसूत्रे २२:६). अशी जबाबदारी माझ्या अंत:करणाला फार भारी वाटते आणि आशा आहे की तुमच्या अंत:करणालाही भारी वाटत असेल. ही जबाबदारी फार भारी आहे की यावर रोज आम्हाला विचार करायला पाहिजे आणि अशी कार्यकारी योजना बनवायला पाहिजे की जेणेकरून आपण त्या जबाबदारीला आनंदाने आणि समाधानाने पूर्ण करू शकू. उपयुक्त प्रशिक्षणाने आम्ही हे सुनिश्चित करू की आमचा मुलगा किंवा मुलगी, जबाबदार नागरिक, प्रेमी पती किंवा पत्नी, सतर्क आई किंवा बाप किंवा प्रभूचा आज्ञाधारक सेवक बनेल.

मुलाला नियंत्रित करणे ही एक गोष्ट आहे आणि स्वअनुशासनाद्वारे आपल्या स्वत:ला नियंत्रणामध्ये राहायला शिकविणे वेगळी गोष्ट. जर असे केल्या जाते तर हे मोठ्या सावधगिरीने आणि (प्रार्थनापूर्वक) धैर्यानेच होईल. यासाठी त्या गोष्टींमध्ये ज्या तुम्ही तुमच्या लेकरांमध्ये टाकू इच्छिता तर आपण स्वत:ला कठोर अनुशासनात ठेवणे अत्यंत आवश्यक होईल. केवळ तेव्हाच तुम्ही तुमच्या लेकरांमध्ये अनुशासन आणि त्या गोष्टीपासून दूर राहण्याची सवय घालू शकता जी त्याच्या शारीरिक आणि आध्यात्मिक हितासाठी अडखळण आहे. प्रशिक्षणाचे काम तोपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही जोपर्यंत तुमच्या लेकरांमध्ये सर्वांत चांगले निवड करण्याची मजबूत इच्छा आणि त्या पसंतीची जबाबदारी घेणे टाकत नाही.

समजदार आई-वडील लेकरांना स्वत: विचार करायला प्रोत्साहित करतीलस परंतु सुरूवात करायला दिशा देण्याची गंभीर जबाबदारी आई-

वडिलांची आहे. जोपर्यंत लेकरू त्या निर्णयाला घेऊन जे मजबुतीने ख्रिस्तावर केंद्रीत मूळ पद्धतीमध्ये बनले आहे, की योग्य रितीने विचारकरण्याच्या योग्यतेचा अभ्यास करत नाही तोपर्यंत त्याची शिकवण अर्धवट आहे. जर लेकराला सत्यतेने निर्णय घेण्यासाठी शिकविल्या जाते आणि प्रोत्साहित केल्या जाते, आणि त्यामध्ये राहायला शिकविले जाते, तर आईवडील या आश्वासनाने की, लेकरू म्हातारा झाल्यावरही सत्याच्या मार्गातून फिरणार नाही, जीवनात उपयुक्त समयी नियंत्रित करू शकतो. आईवडील बनणे यापेक्षा मोठा आशीर्वाद काय असू शकतो ?

भविष्याला स्पर्श करा...
लेकरांना शिकवा.
मी माझ्या लेकरांना पुस्तकातून शिकवू पाहिले
मला तो परेशानच दिसला.
मी माझ्या लेकरांना गोष्टींनी शिकवू पाहिले
ते त्याच्या डोक्यावरून
असेच गेले
तेव्हा हैरान होऊन मी
एकीकडे गेलो
"कसे शिकवू माझ्या लेकरांना ?
ओरडून मी म्हटले !
माझ्या हातात किल्ल्या देत
मला म्हटला तो
"या माझ्यासोबत खेळा".

• • •

# जळते झुडूप

- टी.पीयर्स ब्राऊन

निर्गम अध्याय ३ मध्ये त्या जळत्या झुडूपाविषयी जे भस्म होत नव्हते, आम्हाला परमेश्वराला मोशेला दर्शन देण्याविषयीची गोष्ट मिळते जरी त्या सर्व धड्यांची आम्हाला माहिती नाही जी मोशेला या गोष्टीकडून मिळाली, परंतु काही धडे आहेत जे आम्हाला वाटतात की तुमच्यासाठी उपयोगी होऊ शकतात.

पहिले, जर आपल्या आत सामान्य जीवनाला बाजूला करून आध्यात्मिक रूची आणि इच्छा आहे तर आम्हाला माहिती होते की, परमेश्वराजवळ आमच्यासाठी मोशेला दिल्या गेलेल्या आज्ञेपेक्षा मोठी आज्ञा आहे. त्याला लोकांना मीसरामधून फारोच्या दासत्वातून काढण्यास परमेश्वराची मदत करायची होती. आम्हाला सर्व जगामध्ये पापाच्या दास्यातून लोकांना काढण्यासाठी परमेश्वराची मदत करण्याची आज्ञा आहे . आमच्यामधून अधिक लोकांसाठी मत्तय २८:१८-२० आजही एक उदाहरण आहे की जो कोणी जवळजवळ २००० वर्षापूर्वी कोणत्या गोष्टीसाठी म्हटला होता. तुम्हाला वळून झुडूपाला पाहणे किंवा परमेश्वराच्या गोष्टीला ऐकणे आवश्यक आहे.

दुसरे, कामासाठी योग्य ठरण्याच्या पहिले आम्हाला परमेश्वराचे सामर्थ्य आणि शुद्धतेला समजणे आवश्यक आहे. "तू आपल्या पायातले जोडे काढ कारण ज्या जागी तू उभा आहेस ती भूमि पवित्र आहे." पेत्र आम्हाला सांगतो आहे "तर ज्याने तुम्हास पाचारण केले तो जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा" (पेत्राचे पहिले पत्र १:१५). म्हणून आपण "धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ" जाऊ (इब्री लोकास पत्र ४:१६), चा अर्थ या तथ्याशी नकार नाही की आम्हाला

परमेश्वराची सेवा "सद्‍भक्तीने आणि सद्‍भयाने"करायला पाहिजे. (इब्री १२:२८)

आम्हाला समजायला पाहिजे की वचन आणि काम दोन्ही केवळ भक्तीचा संकेत देत नाही, परंतु भक्ती निर्माण करायला सहाय्य करते. याचा अर्थ असा नाही की दुसऱ्याद्वारे उपयोग केल्या जाणारे शब्द किंवा प्रार्थनेच्या वेळेस त्यांच्या शरीराची स्थितीला दाखवण्यासाठी त्यांना निर्देश द्यायला पाहिजे, परंतु याचा अर्थ असा आहे की आम्हाला लोकांना नियम शिकवायला पाहिजे, की "तू" किंवा "तुझे" चा वापर किंवा डोके मान खाली करणे किंवा डोळे बंद केल्यावर भक्ती निघणे किंवा याचा संकेत मिळाला तर हे करणे बरोबर आहे. परमेश्वराच्या प्रति भक्ती किंवा श्रद्धेची कमी त्याच्या वचनाच्या आदराच्या कमीपणामुळे बनते आणि प्रत्येक गोष्टीचा परिणाम पाप आणि आज्ञा न मानणे होतो.

तिसरे, होऊ शकते की जेव्हा मोशेने पाहिले की झुडूप भस्म होत राहिले नाही तर तेव्हा त्याला वाटले की, त्याच्यामध्ये स्थायीत्व आणि स्थिरता होती. ज्यामध्ये परमेश्वरही सामील होता. एखाद्या देशाच्या प्रकरणामुळे तेथील सरकार हलू शकते, परंतु आम्हाला एक असे राज्य मिळाले "न हलणारे राज्य" (इब्रीलोकांस पत्र १२:२८), आणि मोशेजवळ तो परमेश्वर होता जो त्या जळत्या झुडूपात होता, ज्याला अन्य सर्व झुडूपे भस्म झाल्यावरही तेथेच राहायचे होते.

चौथे, आम्हाला समजणे आवश्यक आहे. जसे मोशेला समजले असेल की परमेश्वर त्याच्या उपस्थिती आणि सामर्थ्याला दाखविण्यासाठी महत्वहीन किंवा उपयोगात न येणारी समजल्या जाणाऱ्या वस्तूंचा उपयोग करू शकतो आणि मोठमोठे अद्भूत काम करू शकतो. पाच भाकरी आणि दोन मासे असलेला मुलगा, दोन दमड्या असलेली विधवा, गाढवाचा जबडा आणि एक शूरवीर, धनगर आणि एक छोटा दगड घेतलेला लहान मुलगा किंवा जर तुम्ही करू शकता ते केले, जेथे तुम्ही आहात आणि जे

काही काही तुमच्याजवळ आहे, परमेश्वराच्या सामर्थ्याद्वारे जे ही करू शकता, करा.

पाचवे, आम्हाला बहाने बनवणे सोडण्याची आवश्यकता आहे, ते कसेही असो त्याशिवाय आपण महान कार्याला पूर्ण करू शकणार नाही. जे काही बहाने असतील जसे "ते मानणार नाहीत" "मी सांगू शकत नाही" किंवा "माझी काय ऐपत" "सर्व अमान्य आहे" तोच "मी आहे" चे स्मरण ठेवा ज्याने मोशेला पाठविले होते आणि त्याला शक्ती दिली होती. तोच "मी आहे" "जो युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हाबरोबर आहे" (मत्तय २८:२०). आता जोडे घाला, आपली काठी उचला, आणि चालू लागा !

• • •

आम्हाला एक असे राज्य मिळाले
"न हलणारे राज्य"
(इब्रीलोकांस पत्र १२:२८)

# ख्रिस्ताची मंडळी

**- वेस मॅक ॲडम्स्**

**का**ही वेळेस नवीन करारातील मंडळीप्रमाणे असणे ह्याविषयी आपण बोलतो किंवा आपण पहिल्या शतकातील मंडळीसारखे असायला हवे ह्याविषयी बोलतो. आम्हाला करिंथ येथील मंडळीच्या पापांची पुनरूक्ती करायला पाहिजे किंवा काही गलतीयातील मंडळीने केले तसे खोट्या सुवार्तेला स्वीकारायला पाहिजे असे आम्हाला नक्कीच म्हणायचे नाही. पहिल्या शतकातील मंडळ्या परिपूर्ण नव्हत्या.

जेव्हा आम्ही म्हणतो की, पहिल्या शतकातील मंडळीप्रमाणे आम्हाला व्हायला पाहिजे असे मागील २,००० वर्षापासून आम्ही हे सांगत आहोत, ख्रिस्ती धर्मशास्त्रावर मूर्तीपूजक, कॅथोलिक मतानुसारी, अनेक पंथीय आणि अनगणित इतर प्रभावांचा परिणाम झाला आणि त्यांनी ह्या पद्धतीला स्वीकारायला सुरूवात केली. ज्या पद्धती पहिल्या शतकात ख्रिस्तीत्वामध्ये नव्हत्या. जेव्हा आम्ही म्हणतो की पहिल्या शतकातील मंडळीप्रमाणे आम्हाला व्हायला पाहिजे, तेव्हा आम्ही असे म्हणतो की, ख्रिस्ती लोकांनी काय करायला हवे आणि काय विश्वास ठेवायला हवा हे पाहण्यासाठी आम्हाला नवीन कराराकडे वापस यावे लागेल.

तसेच प्रत्यक्षात नवीन करार हा पहिल्या शतकातील मंडळीजवळ नव्हता. तरीही उदाहरणार्थ करिंथ येथील मंडळीमध्ये पौलाने त्यांना लिहिलेले पत्रे होती आणि कदाचित त्यांच्याजवळ इतरही काही पत्रे असतील की ज्यांच्या काही प्रती त्याच्यामध्ये वाटल्या असतील, पण संभाव्यता पहिल्या शतकामध्ये माहिती करून घेण्यासाठी त्यांच्याजवळ नवीन करारातील २७ पुस्तके नव्हते.

म्हणून नवीन करारापासून आम्हाला अधिकार मिळतो, तर त्यांचा अधिकार कोठून येत होता? त्यांनी काय करायला हवे हे ते कसे निश्चित करीत होते?

**प्रेषित आणि संदेष्टे :**

मंडळीच्या प्रारंभापासूनच ख्रिस्ती लोकांना समजले होते की, जर त्यांना येशूची इच्छा माहिती करून घ्यायला पाहिजे तर त्यांना स्वत:ला प्रेषितांच्या शिक्षणात वाढणे गरजेचे होते (प्रे.कृ. २:४२). प्रेषित येशूचे अधिकृत प्रतिनिधी होते. सर्व सत्यात पवित्र आत्म्याने त्यांना मार्गदर्शन केले होते (योहान १६:१३). पवित्र आत्म्याने सर्व काही जे येशूने त्यांना शिकविले होते ते त्यांच्या स्मरणात आणले (योहान १४:२६). त्यांना ख्रिस्ताचे मन होते (१ करिंथ २:१६). जेव्हा आम्ही म्हणतो की आम्हाला पहिल्या शतकातील मंडळीसारखे नवीन करारातील मंडळीसारखे व्हायचे आहे तेव्हा आम्ही म्हणत असतो की आम्हाला प्रेषितांच्या शिक्षणात स्वत:ला समर्पित करायला पाहिजे.

पौलाने इफिस ४:११-१२ मध्ये म्हटले, "आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेटे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिलेरु ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतसे नेण्याकरिता सिद्ध करावे". प्रेषितासह भर म्हणून इतर संदेष्टेही होते की जे पवित्र आत्म्याद्वारे चमत्कारिकरित्या चालविल्या गेले व देव त्यांच्यासोबत बोलला. तरीही, पौलाने करिंथ येथील मंडळीला चेतावनी दिली की हे चमत्कारिक दान लवकर संपतील. "... संदेश असले तरी ते संपतील, भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती संपेल" (१ करिंथ १३:८). मला विश्वास आहे की जेव्हा प्रेषितांच्या द्वारे देवाची संपूर्ण इच्छा प्रकट झाली आणि त्यांनी नवीन करारातील २७ पुस्तके लिहिली तेव्हा ही दाने समाप्त झाली. तरीपण, जोपर्यंत ही दाने होती तोपर्यंत पहिल्या शतकातील मंडळी भविष्य वाणी केलेले संदेश ऐकू शकत होती.

**सुवार्तिक, मेंढपाळ आणि शिक्षक :**

पहिल्या शतकातील मंडळीने काय करावे आणि काय विश्वास ठेवावा हे फक्त प्रेषित आणि संदेष्टयांनीच शिकविले नाही तर तिमथी आणि तीत ह्या मनुष्यासारख्या, सुवार्तिकांना प्रेषितांनी प्रशिक्षण दिले. त्यांनी ह्या सुवार्तिकांना मंडळ्यामध्ये शिकविण्यास पाठविले होते की जे काही प्रेषितांद्वारे त्यांना शिकविण्यात आले होते त्यामुळे ते "दोष दाखविणे, निषेध करणे आणि बोध करण्यासाठी" मंडळीमध्ये होते. (२ तिमथी ४:२). ते प्रत्येक मंडळयामध्ये वडिलांची नेमणूक करीत होते (तीत १:५) आणि जे काही त्यांनी प्रेषितांपासून ऐकले होते ते "इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून देत होते" (२ तिमथी २:२).

आजचे सुवार्तिक जे प्रेषितांच्या सिद्धांताला शिकण्यासाठी स्वत:ला समर्पित करतात आणि इतरांकडे सोपवितात ते पहिल्या शतकातील त्या सुवार्तिकांच्या पदचिन्हावर चालत आहेत. आम्हासाठी दिर्घकाळपर्यंत प्रेषित राहिलेले नाहीत, पण आम्हाजवळ नवीन करारातील पानांमध्ये त्यांची शिकवण आहे, आणि आम्हाला आताही सुवार्तिकांची गरज आहे की जे त्यांचे संदेश म्हणजेच ख्रिस्तांचे संदेश वाटतील.

म्हणूनच पहिल्या शतकातील मंडळीमध्ये सुवार्तिक होते की ज्यांनी प्रेषितांचे सिद्धांत शिकविले. त्याचप्रमाणे प्रत्येक मंडळीवर परिपक्व ख्रिस्ती पुरुशांना सेवा करण्यासाठी मेंढपाळ (शेफर्ड) आणि शिक्षक म्हणून नेमणूक केल्या गेली. ह्या मेंढपाळांना मंडळीवर देखरेख करण्यासाठी नेमण्यात आले होते आणि ते त्यांच्या आत्मिक कुशलतेसाठी जबाबदार होते. पहिल्या शतकातील मंडळीतील ख्रिस्ती लोकांना त्यांच्या मेंढपाळांचे ऐकावेच लागत होते. इब्रीकराचा लेखक लिहितो की, "आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणास हिशेब द्यावयाचा आहे हे समजून ते तुमच्या जीवाची राखण करितात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे, तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही" (इब्री १३:१७

● ● ●

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition, Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds, Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

---

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**

**"Sathya Vazhi",** Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**

**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**

**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI**

**TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**
T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.
Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**

**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

| | | |
|---|---|---|
| T.V. Program | : | **Shubh Sandesh Hindi Channel**<br>Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm |
| Speakers | : | **Sunny/ Francis/ Vinay David** |
| Magazine | : | **English Bible Teacher - Sunny David**<br>E-mail : sunny_davidin@yahoo.co.in<br>Cell : 09810896789<br>**Hindi Bible Teacher - Francis David,**<br>Email : davidfrancis53@rediffmail.com<br>Cell : 09911916932 |
| Bible Courses | : | **Hindi & English - Vinay David**<br>Emai: vinay_david2002@yahoo.co.in<br>Cell : 09911719517 |
| Church meets at: | | C.R. Park, 1st block, Near Market<br>No. 4, New Delhi - 110019 |
| Sunday Worship: | | 11.00 a.m. |

**For more information write to :**

**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**MARATHI**

**WORDS OF HOPE**

| | | |
|---|---|---|
| Speaker | : | **Amul Bansode** |
| T.V. Program | : | **MCN News Channel**<br>Monday, Wednesday, Friday<br>7.30 a.m. to 8.00 a.m. |

**For more information & Bible course write to**

**Aurangabad Church of Christ,** F/5 Siyon Nagar,
Pahadsingpura, Aurangabad. (MS) India
Mob. : 9049941066 / 9922262067

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421